
शनिवार । १८ मार्च १९७२ । पन्नास पैसे

# माणूस

## एका भव्य राष्ट्रीय स्वप्नाची रूपरेषा



| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | १८ मार्च १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | बेचाळीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार....**

□ २६ फेब्रुवारीच्या 'माणूस' अंकातील डॉ. विद्याधर पुंडलीक यांचा 'सावरकरांचे सामाजिक विचार' हा लेख अतिशय उद्‌बोधक व मननीय वाटला. सावरकरांच्या समाजविषयक लेखनाच्या निमित्ताने महाराष्ट्रीय समाजसुधारकांच्या लेखनाचेही सम्यक आकलन या लेखात दिसून येते, तेही मोलाचे वाटते. धन्यवाद. डॉ. पुंडलीक यांना सप्रेम नमस्कार: 'कोल्हटकरांचा मुलगा' हा श्री. रवींद्र पिंगे यांचा लेख वाचून मनात गहिवरून आले. अखेरीच्या काही दिवसांत ते (श्री. प्र. श्री. कोल्हटकर) सोलापूर येथे 'सोलापूर समाचार' मध्ये काही लेखन करण्याच्या निमित्ताने वगैरे राहिले होते. तेव्हा केव्हा घरी येत असत व 'अतरीची व्यथा' बोलून दाखवीत असत. तेव्हा या बुद्धिमान पण दैवहत साहित्यसेवकाची ती मूर्ती पाहून पोटात तुटत असे. असो आपण व रवींद्र पिंगे यांनी त्यांना भावांजली वाहिली याबद्दल कृतज्ञता वाटते.

८ मार्च, १९७२ — वि. म. कुलकर्णी, सोलापूर

□ पश्चिम रेल्वेच्या वसई स्टेशनरोडला श्री. मंजुनाथ नायक नावाचे एक तरुण हॉटेल दुकानदार रहातात. खरे म्हणजे ते मंगलोरिअन आहेत. पण मराठी साहित्य वाङ्मय, नियतकालिके यांच्या वाचनात आणि मननात ते एवढे गढलेले असतात, की त्यांचे घरात खटके कसे उडत नाहीत हेच समजत नाही. बहुतेक मराठी

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५१

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

साहित्यिक, संपादक, टीकाकार यांचा त्यांच्याशी काहीना काही मित्रत्वाचा संबंध आहे.

साडेतीन चार वर्षांपूर्वी मंजुनाथ नायकांनी प्रथमच माझ्या हातात माणूसचा एक अंक दिला. 'आणि ड्रॅगन जागा झाला' या लेखमालेचा तो अंक होता त्या वेळपासून मी माणूसचा ग्राहक-वाचक आहे.

---

# वारल्यांची अवस्था भिल्लांसारखीच !

---

१९६८ ते ७० अखेरपर्यंत म्हणजे सुमारे तीन वर्षे अधूनमधून मी आपणाकडे सहा पत्रे पाठविली आणि कळकळीने विनंती केली, की विकत न मिळणारे संपादक आणि रिपोर्टर महाराष्ट्रात दुर्मिळ होत चालले आहेत. खऱ्या गोष्टी वृत्तपत्रे दडवून ठेवतात आणि राज्यकर्त्यांची रटाळ भाषणे, निवेदने तेवढी छापतात. आदिवासी जगतात महाराष्ट्रात अराजक आहे. तुम्ही तिकडे जरा लक्ष द्या. कारण 'माणूस' हा सत्य आणि वस्तुस्थिती छापताना भाडभीड वा लाचारी पत्करणारा दिसत नाही. म्हणून माजगावकरांचा 'माणूस' वारल्यातील माणूस निश्चित जागा करील.

माझ्या सहांपैकी एकाही पत्राची दखल आपणाकडून घेतली गेली नाही. पण दरम्यान अनिल बर्वेंचे नक्षलवादावर लेख येऊ लागले. त्या लेखांपायी माझ्या अंकांवर तरुणांच्या उड्या पडू लागल्या. वारली तरुणांत अनिल बर्वेंचे लेख सामुदाइकरीत्या वाचू जाऊ लागले. न कळत माझा भाव वाढू लागला. कारण ग्रामीण भागात 'माणूस'चे वेड मीच लावले होते.

आता गेल्या ६–७ महिन्यांपासून आपण शहादे, पाटीलवाडीवर गुंग झाला आहात. मी पुन्हा मंजुनाथ नायकांना म्हटले, हा तर माझा विजय आहे. अखेर प्रामाणिक, स्वाभिमानी असा संपादक आदिवासींची सत्य स्थिती जगासमोर आणणारा 'माणूस'चाच निघाला.

शहादे, पाटीलवाडीवरील दुर्दैवी प्रकार वाचले. पण यावर ताण करणारे प्रकार ठाणे जिल्ह्यात चालले आहेत. अगदी महसूल मंत्री ह. गो. वर्तकांच्या तालुक्यात चालले आहेत. वारल्यांचे खून होतात आणि त्यांच्या जमिनी बाहेरील सावकर ताब्यात घेतात. मामलेदार, प्रांत यांच्या कचेरीतील वारल्यांना फेवरेबल असे डाक्युमेंटरी एव्हिडन्सेस नष्ट केले जात आहेत. तलाठी, कलेक्टरचे अधिकार वापरून वारल्यांच्या जमिनी सरेण्डर करून सावरकरांना देत आहेत. प्रांत, कलेक्टर यांनी वारल्यांच्या जमिनींच्या तंट्यांचे निकाल लिहिण्यापूर्वी पाटील लोक सत्यनारायणाच्या पुजांतून निकाल आपल्या बाजूने लिहिले गेले असे सांगत आहेत.

लाचार प्रांत मागावून अगतिक होऊन पाटलांच्या बाजूने निकाल लिहीत आहेत. वारल्यांविरुद्ध खोटया चॅप्टर केसेस आणि फौजदारी गुन्हे दाखल होत आहेत. साक्षीदार कोर्टात हजर नाहीत म्हणून केसेस उडवून लावल्या जात आहेत. हेलपाटयांनी हैराण झालेले वारली आपल्या जमिनी, झोपडया, तरुण मुली, बायका अगतिक होऊन सावकरांना देत आहेत. वारल्यांच्या बायकांवर बलात्कार, हात टाकणे ह्यात सावकार-गुंडांना काहीच वाटत नाही. वसईच्या पोलीस स्टेशनवर अशा गुन्ह्यांची दखल घेतली जात नाही. पोलीस स्टेशनवर मागावून कागदपत्रे बदलण्याचे अधम प्रकारही सर्रास चालले आहेत.

तहसिलदार वारल्यांच्या उभ्या पिकांचे कबजे सावकारांना देत आहेत. चौकशीसाठी कलेक्टरने केस मागविली तर कलेक्टर कचेरीतून केसच नष्ट केली जात आहे. चॅप्टरकेसमधे आरोपी वारल्यांनी आरोपपत्र मागितले तर ते नाकारण्यात येते. भर कचेरीत मामलेदार गलिच्छ शब्द वापरतात. फौजदार उघडपणे खोटे गुन्हे नोंदवितो. विनोदाची गोष्ट म्हणजे आपल्या राक्षसी सावकारीला व शारीरिक भुकेला कोणी कार्यकर्त्यांनी अडथळा आणला तर सावकार फौजदाराला सांगतो, की तो अमुकतमुक 'नक्षलवादी' आहे. फौजदार तथाकथित नक्षलवाद्याला उचलून गजाआड करतो. महाराष्ट्राच्या पोलीस आणि महसूलखात्याची ही केविलवाणी अधोगती आहे.

आणि हे सर्व प्रकार कुठे चालले आहेत ? तर आधुनिक भारताची इंद्रपुरी असलेल्या व वैभवसंपन्न मुंबापुरीच्या कुशीला असलेल्या वसई आणि भिवंडी तालुक्यात हे राक्षसी प्रकार घडत आहेत. आता 'माणूस'ने आपला मोर्चा ठाणे जिल्ह्याकडे वळवावा.

४ मार्च १९७२ — गो. बा. सामंत, कामण, (ता. वसई)

□ 'माणूस' नित्य चाळतो. आवडतो. विषयवैविध्य आणि लेखनस्तर चांगले वाटतात. हे पत्र खास श्री. रमेश ज्ञाते यांची 'सारं काही बाबांना सांगणारी मुलगी' ही कथा वाचून ताबडतोब लिहावयास घेतले. कथा हळवी असली तरी शैलीदार आणि रसवान वाटली. निवेदन आकर्षक जमून गेले आहे. 'लव्ह-ट्रँगल्'च्या दिशेने कथा कलंडणार असा संशय निर्माण होण्यापूर्वीच कथा धूसर आणि औत्सुक्य वाढविणाऱ्या वातावरणात संपते हे आवडले. उगीच शब्दबंबाळ पाल्हाळ लावले नाही म्हणून रंगत शेवटपर्यंत टिकत आणि वाढत जाते. अशाच कथा छापा. आपल्या अंकातील इतर लेखनही चवीनं वाचतोच.

प्रा. शिरीष चिधडे,

९ मार्च १९७२ — प्रा. मुकुंद इनामदार, शिरूर

□ □ □

विजय वैद्य

# मुंबई वार्ता

दिनांक ९ मार्च

## असे मतदार ! अशा गमतीजमती !!

काल गिरगावातूनच मी फिरायला सुरुवात केली. रस्त्यावरील वातावरण वा मतदानकेंद्रावरील मतदारांचे चेहरे जे काही सांगतात ते तसे खरे नव्हे. तरी एकूण मतदानाचा अंदाज यावरून बांधता येतो. निवडणुकांचे निकाल लागेपर्यंत अगदी अपक्ष उमेदवारही 'आपणच निवडून येणार' असे छातीठोकपणे सांगत असतात. निकाल लागताच पराभूत उमेदवारांवर छाती पिटून घ्यायची पाळी येते. (विशेषतः अनामत रक्कम सरकारजमा झाली असल्यास !) निवडणुकीच्या दिवशी सारेच उमेदवार तेजीत असतात. एखाद्या मंत्र्याच्या थाटात ते मोटारीतून मिरवत जात असतात. असोत बापडे ! तो त्यांचा दिवस असतो. आपण नक्कीच निवडून येणार व त्यानंतर अशाच तोऱ्यात जायला मिळणार असे मनात मांडेही ते खात असतात. उमेदवार सत्तारूढ पक्षाचा असेल तर त्याला मंत्रीपद, राज्य मंत्रीपद, उपमंत्रीपद वगैरे वगैरेंचे डोहाळे लागलेले असतात.

तेव्हा सांगायचे काय, की निवडणुकीपूर्वी 'मतसम्राटां'चे उंबरठे झिजविणारे, त्यांची मते, आशीर्वाद मागणारे उमेदवार, निवडणुकीच्या दिवशी 'जनते'ला चुटपुटते दर्शन देत असतात आणि आघाडीवरील सेनापती ज्याप्रमाणे छावण्यांना भेटी देत असतो तशाप्रकारे रस्त्यावर टेबले टाकून याद्या घेऊन बसलेल्या आपल्या कार्यकर्त्यांच्या छावण्यांना भेटी देत असतो. कार्यकर्ते अर्थातच समाधान पावत असतात.

'काय रावसाहेब, आपला काय अंदाज आहे ?' असा प्रश्न उमेदवार व पक्षनेते यांना विचारल्यावर, त्याचे काय उत्तर येणार याचा पत्रकाराला पूर्ण अंदाज असतो. तरीही त्याला हा प्रश्न विचारावाच लागतो. कारण त्यालाही या साऱ्यांकडून मिळालेल्या उत्तरातून व एकूण वातावरणावरून अंदाज बांधायचा असतो. यातून अनेक वेळा गंमतीदार व मासलेवाईक किस्से हाती लागतात. पण सगळ्यांत गमतीदार प्राणी असतो मतदार. त्याच्या कथा काय आणि किती वर्णाव्यात ! त्याचे रामायण महाभारत होईल. आपण पत्रकार असल्याची कल्पना न देता मतदारांशी

गप्पा मारल्या, की तो मोकळेपणे बोलतो तर निवडणूक अधिकारीही अनेक गमतीदार प्रसंग सांगतात.

## ‘ बोथ आर यूसलेस ! ’

कालची माझ्या फेरीची सुरुवात फारच छान झाली. एक-दोन मतदान केंद्रांना भेट देऊन मी गिरगावातील आर्यन एज्युकेशन हायस्कूलमधील पहिल्या मजल्यावरील मतदान केंद्रावर गेलो. एकूण मतदार किती, किती मतदान झाले वगैरे प्राथमिक प्रश्न विचारल्यावर काही नाविन्यपूर्ण वगैरे घडले का असा प्रश्न तेथील केंद्राध्यक्षाला विचारला आणि काय मजा पाहा, एक छानपैकी गंमत ऐकायला मिळाली. त्या केंद्रकक्षेत येणाऱ्या एका मतदाराने तिथे जाण्याची, रांगेत उभे राहण्याची व इतर सारे सोपस्कार पूर्ण करण्याची तसदी घेतली. एवढेच नव्हे, तर मतदान पत्रिकाही घेतली पण नंतर साहेबांची काय लहर फिरली कोण जाणे. साहेब मतदान केंद्राध्यक्ष साहेबांकडे जाते झाले. आणि ‘ बोथ दि कॅन्डिडेंट्स् आर यूसलेस, आय एम नॉट गोइंग टू व्होट इदर ऑफ देम् ! ’ असे म्हणून त्यांनी मतपत्रिका केंद्राध्यक्षांच्या हाती ठेवली व ते निघून गेले.

## गांधी ? अगदी महात्मा गांधीसुद्धा नकोत !

नायगाव येथ एका शाळेत असलेल्या केंद्रात दुसरा एक मजेदार प्रकार घडला. शाळाच ती, त्यामुळे थोरामोठ्यांच्या तसबिरी तेथे असणारच. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या वाट्यालाही तेथील एका भिंतीवरची थोडी जागा आली. यावर एका पक्षाच्या पोलिंग एजंटचा पारा चढला. (वा, महात्माजींचा फोटो म्हणजे काय. त्यांच्याकडे पाहून मतदार एखाद्या पक्षाला मते देण्याची शक्यता नाही का ? तेव्हा गांधींचीही यात लुडबुड नको असा त्यांच्या मनात विचार आला असावा.) त्यांनी महात्मा गांधींची तसबीर तेथे असण्याला चक्क हरकत घेतली, पण ती त्या शाळेची मालमत्ता आहे असे केंद्राध्यक्षांनी सांगताच मात्र त्यांनी आपली हरकत मागे घेतली.

## ...तर मी (इंदिरा) गांधींकडे तक्रार करीन !

महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. एम. डब्ल्यू. देसाई यांच्या कचेरीतील फोन काल दुपारी दोनच्या सुमारास खणखणला. ‘ व्हिला टेरेसा ’ असे नाव सांगणाऱ्या महिलेने फोन केला होता. फोनचे प्रयोजन काय होते ?

‘ पाच मिनिटांच्या आत जर मला मतदान करू दिले नाहीत, तर प्रधानमंत्र्यांकडे तक्रार करीन ! ’ ‘ आपण अपक्ष उमेदवार असून आपले मतदारांच्या यादीत

नाव नाही ' असे सांगून ती पुढे म्हणाली, ' ७० माणसांसह एका केंद्रावर (ज्या केंद्राचे नाव व पत्ता तिला माहिती नव्हता.) आपण उभे असून पोलीस अटक करण्याची धमकी देत आहेत. '

## स्वतःलाच टोप्या घातल्या

टोपी घालणे हा प्रकार निवडणूका जवळ आल्या, की जोरात सुरू होतो. निवडणुकीच्या काळात टोप्या नाही घालायच्या तर कधी अशी अनेकांची प्रामाणिक समजूत. त्यामुळे या दिवसात टोप्यांचा सुकाळ असतो. काल, पांढऱ्या, लाल, केशरी, भगव्या, निळ्या आणि हिरव्या टोप्यांचे अमाप पीक आले होते. सबंध मुंबईभर शिवसैनिक तर नजरेतच भरत होते. त्यांनी भगवे गुरू शर्टस घातले होते आणि त्यांच्या टोप्या होत्या नेपाळी पद्धतीच्या पण भगव्या रंगाच्या. गिरगाव मतदार संघातील शिवसेनेचे उमेदवार श्री. प्रमोद नवलकर यांनीही भगवा गुरू शर्ट परिधान केला होता. काही शिवसैनिकांनी गळ्यात माळा घातल्या होत्या व गो गो गॉगल्स लावले होते.

## ....न अवघे...(?)...वयमान !

गावदेवी येथील मास्टर्स टच्युटोरिअल हायस्कूल मधील एका केंद्रावर यादीने एका मतदाराला व इतरांनाही चांगलाच धक्का दिला. यादीत त्या मतदाराचे वय



१९ वर्षे असे दिले होते. पण हे ' वृद्धयुवा ' प्रत्यक्षात २५ वर्षांचे होते.

## आम्हाला मतदानाचा अधिकार नाही का ?

टागोर नगर येथील रांगेने ३९ इमारतीतील मतदारांची मतदारांच्या यादीत नावे नव्हती असे खासदार राजा कुलकर्णी यांनी सांगितले.

कुंभारवाडा मतदार संघातील एका मतदार केंद्रावर सुमारे ५०० मतदारांनी निदर्शने केली. त्यांची यादीत नावे नव्हती म्हणून त्यांनी असे केले. पण आपल्या मतदानाच्या हक्काबद्दल जागरूक असणाऱ्या त्या मतदारांना पोलिसांनी पिटाळून लावले.

## ' नो वॉटर नो व्होटर ! '

पाण्याची कटकट ही मुंबईच्या पाचवीलाच पुजलेली आहे. पण त्यातही उप-नगारातील नागरिकांचे पाण्याचे हाल काय सांगावेत ! निवडणूकीच्या आदल्या दिवशी तेथील लोकांना (कांदिवली, बोरिवली वगैरे विभाग) पाण्याचा एक टिपूसही मिळालेला नव्हता. अगदी चातकाप्रमाणे लोक पाण्याची वाट पहात होते. बऱ्याच खटपटीनंतर निवडणुकीच्या दिवशी सकाळी ९ वाजता पाणी आले एकदाचे. ३८ तास पाण्याविणा काढावे लागले होते म्हणूनच ' नो वॉटर नो व्होटर 'च्या घोष-णांनी तेथील लोकांनी नितडणुकीचे स्वागत केले.

## ' वासरू आमचे गाय तुमची '

वाळकेश्वर मतदार संघ. एच. एन. त्रिवेदी (नवकाँग्रेस) व सौ. जयवंतीबेन मेहता (जनसंघ) असा तेथे सरळ सामना. नवकाँग्रेसविरोधी काही युवकांनी तेथे मजा केली. श्री. त्रिवेदी यांच्या केंद्रावर त्यांनी एक वासरू आणून सोडले. त्या वासराच्या गळ्यात दोन पाट्या होत्या, एका पाटीवर मजकूर होता. ' वासरू आमचे गाय तुमची ' तर दुसऱ्या पाटीवर लिहिले होते, ' वासराने मतदान केले, आता त्याला तुमच्या खर्चाने दिल्लीला गाईकडे पाठवा.'

असे कितीतरी किस्से सांगता येतील. अशा मतदारांशिवाय वा गमतीजमती-शिवाय निवडणुकीला रंग चढत नाही, एवढे मात्र खरे. याबाबत माझा एक मित्र मला म्हणाला निदान अशा गमतीजमतींसाठी तरी वारंवार निवडणुका याव्यात.

□ □ □

# दक्षिणवाहिनी गंगा

## प्रत्यक्षात येणारं प्राचीन स्वप्न !

श्रीकांत वर्तक

आजची अद्वितीय गोष्ट कालचे स्वप्न असते !

असामान्य प्रतिभेचे महान द्रष्टे स्वप्नं रंगवतात आणि प्रत्यक्षात आणतात. एकेकाळची उत्तरवाहिनी सुरसरिता गंगा अंशतः दक्षिणवाहिनी करून कुरु आणि पांचाल प्रदेश सुजलाम करण्याचे भव्य स्वप्न इक्ष्वाकु कुलातल्या दिलीपराजाने कल्पिले अन् तितक्याच प्रतिभेच्या त्याच्या पुत्रांनी—भगीरथ प्रयत्नांनी ते साकार केले. याच गगानदीला संपूर्ण दक्षिणवाहिनी करून—गंगोदक रामेश्वरापर्यंत पोचवून हिंदीमहासागराशी गंगेचे मिलन घडवून आणण्याचे स्वप्न प्राचीन ऋषिमुनींपासून ते अर्वाचीन तज्ज्ञापर्यंत अनेकांनी पाहिलं ! केंद्रीय पाटबंधारे मंत्री डॉ. के. एल. राव यांच्यासारखा जागतिक कीर्तीचा तज्ज्ञ जेव्हा या स्वप्नाने भारला जातो तेव्हा ते स्वप्न, स्वप्न उरत नाही ! ते कागदावर योजनारूपाने साकार होऊ लागतं !! प्रत्यक्षात येऊ पहाणाऱ्या या भव्यतर राष्ट्रीय स्वप्नाची रूपरेषा आपणास माहीत असणे आवश्यक आहे. तेच या लेखाचे प्रयोजन !

पवित्र गंगेचे दक्षिणसागराशी मीलन घडवून आणण्याचे स्वप्न प्राचीन काळा-पासून भारतीय सतत मनाशी बाळगून आहेत. किंबहुना या भव्यतर स्वप्नाचा विसर भावी पिढ्यांना पडू नये म्हणून गंगोदकाची कावड रामेश्वरापर्यंत नेऊन त्याला गंगोदकाने स्नान घालून पुण्य मिळविण्याचा संकेत निर्माण करण्यात आला.

केंद्र सरकारकडून या राष्ट्रीय स्वप्नाला सत्यस्वरूपात आणण्यासाठी काही प्राथमिक स्वरूपाच्या योजना तयार करण्यात येत आहेत. त्यांची माहिती करून घेण्यापूर्वी जी गंगा दक्षिणवाहिनी करावयाची आहे, तिची माहिती असणे आवश्यक आहे.

हिमालयाच्या दक्षिण उतरणीवर गंगेचा उगम होत असून त्या ठिकाणची समुद्र-सपाटीपासूनची उंची अंदाजे १३०० फूट आहे. हिमालयातील अनेक हिमनद्यांपैकी एकीच्या शेवटच्या टोकापासून जो प्रवाह निघतो तोच गंगेचा उगम समजला जातो. गंगोत्रीकडून पश्चिमेकडे वहातवहात हिमालयाच्या दक्षिण रांगांमधून हा प्रवाह दक्षिणेकडे वळतो. तेथून आग्नेयेकडे जाऊन प्रयागजवळ पूर्ववाहिनी होऊन पूर्वेकडे ४०० मैल गेल्यावर परत दक्षिणेकडे वळून अनेक मुखांनी बंगालच्या उपसागरास मिळतो. संयुक्तप्रांतातून वहात जाताना गंगेस रामगंगा, यमुना, गोमती इत्यादी नद्या मिळतात. बंगालच्या हद्दीवर घोग्रानदी मिळते तर पाटण्याजवळ शोणनदीशी संगम होतो. त्यानंतर गंडकी तिला येऊन मिळते व बंगालच्या उपसागराला सहस्त्र मुखांनी मिळत असता ब्रह्मपुत्रा ही मोठी नदी येऊन मिळते. गंगेची एकूण लांबी १५५७ मैल आहे.

दक्षिणेकडे गंगा नेण्याच्या प्रकल्पात उत्तर, मध्य व दक्षिण भारतातील मुख्य-नद्यांचे प्रवाह एकमेकात सोडून त्यांचे एकत्रीकरण करण्याची मुख्य योजना समा-विष्ट आहे. भारतातील नद्यांचे प्रामुख्याने वर्गीकरण दोन वर्गात होते. (१) उत्तर भारतातील हिमाच्छादित भागातून कायम पाणी पुरवठा होणाऱ्या व (२) मध्य व दक्षिणभारतातील भूगर्भातील व पावसाच्या पाणलोटाच्या मार्फत पाणीपुरवठा होणाऱ्या नद्या! यांपैकी पहिल्या वर्गातील महत्त्वाच्या नद्या म्हणजे सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा या होत. त्या बारमाही वहातात, मात्र हिवाळ्यात त्यांचा पाणीपुरवठा काहीसा कमी होतो. या नद्या व त्यांच्या उपनद्या भारतातील सर्व नद्यांच्या ६०% पाणी त्यांच्या भागात पुरवितात.

मध्य व दक्षिणभारतातील महत्त्वाच्या पूर्ववाहिनी नद्या महानदी, कृष्णा, गोदावरी, कावेरी या असून तापी व नर्मदा या महत्त्वाच्या पश्चिमवाहिनी नद्या समजल्या जातात. पावसाळ्यात त्यातून प्रचंड पाणलोट वाहून समुद्रात फुकट जातात. उन्हाळ्यात त्यांची पात्रे बहुतांशी कोरडी असतात व त्यांचा जलसिंच-नाच्या दृष्टीने त्यांचा फारसा उपयोग होत नाही.

वरील प्रकारामुळे व हंगामी फेरबदलामुळ जलसिंचनाखाली हुकमी क्षेत्र निश्चित करता येत नाही व नदी हे पाण्याचे साधन म्हणून पूर्णत: उपयोगात आणता येत नाही. म्हणून मोठे पाणसाठे (Reserviors) निर्माण करणे व नद्यांची पात्रे एकमेकांस जोडून एक संलग्न जलसाखळी तयार करणे आवश्यक ठरते.

पावसाळ्यात पाटण्याजवळ गंगेच्या प्रवाहातून अंदाजे १८० एकर फूट दशलक्ष पाणलोट जातो. गंगेच्या सर्व उपनद्यांच्या पाण्याचा कमाल वापर लक्षात घेऊनही पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी प्रचंड प्रमाणात उरते. ते निरनिराळ्या नद्यांच्या पात्रांतून थेट कावेरी नदीत सोडणे शक्य आहे. त्यामुळे म्हैसूरचा पठारीप्रदेश व राजस्थान यांना मुबलक पाणीपुरवठा करणे शक्य होईल. भूपृष्ठीय नकाशे (Topo-sheets) ही योजना शक्य असल्याचेच दाखवीत आहेत. सर्वच्या सर्व पहाणी व अंदाजपत्रके करण्यासाठी कित्येक वर्षे घालवावी लागतील व प्रत्यक्ष योजनेची सुरवात इ. सन २००० च्या प्रथमार्धात होईल. यावेळी भारताची लोकसंख्या १०० कोटीपर्यंत गेलेली असेल.

या प्रकल्पाचे या घटकेस फक्त ठोकळ स्वरूपच सांगता येईल. त्याचाच तपशील या लेखात दिलेला आहे. पावसाळ्यात गंगेतून येणारे अधिक पाणी (अंदाजे १० ते २० दशलक्ष एकर फूट) पाटण्याजवळ + १५० फूट उंचीवर पंपाने खेचून ‘दरधा’ नदीत सोडून ‘मोरहार’पर्यंत बंधारे बांधून वर चढवीत + १००० फूट उंचीपर्यंत नेण्यात येईल. मोरहर व उत्तर कोअल खोरे दुभंगणारा उच भाग कालव्यांनी पार करून पाणी पंपांनी योग्य त्या उंचीपर्यंत चढविले जाईल. कंटूर कॅनॉलने पाणी + २००० फूट उंचीपर्यंत पोचविले जाईल. हाच कालवा पुढे रिहांद खोरे ओलांडून रिहांद व महानदी खोरे विलग करणाऱ्या भागाच्या बाजूबाजूंने पुढे नेऊन महानदी खोऱ्याच्या उच्चतर भागांपर्यंत पोचविण्यात येईल. दरम्यान काही ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करून पाण्याचे प्रचड साठे निर्माण केले जातील. महानदी व नर्मदा खोरे विभागणाऱ्या भागातून कालवा नर्मदा खोरे ओलांडून नर्मदा व वैनगंगा यांना दुभंगणाऱ्या भागातून वैनगंगेच्या खोऱ्यातून विदर्भ भागातून ‘पेंच’ ओलांडून वैनगंगा व तापी खोरे अलग करणाऱ्या विभागात येईल. तेथून पैनगंगेच्या खोऱ्यातून त्याचा प्रवास चालू होऊन पैनगंगा व गोदावरी खोरे विभागणाऱ्या भागातून सरळ गोदावरी नदीत उतरेल. अशा रीतीने उत्तरेतील गंगा दक्षिणेकडील गंगेत प्रवेश करील. हे मीलन ‘पोचमपाड’ धरणाजवळ होईल.

‘पोचमपाड’ पाणसाठ्याची एफ. आर. एल. + १०९१ फूट असल्यामुळे गंगेचे पाणी कृष्णा नदीवरील ‘श्रीशैलम्’ पाणसाठ्यात उतरविणे सहज शक्य होईल. (श्रीशैलम् पाणसाठ्याची एफ. आर. एल. + ८८५ फूट आहे) याकरिता सुमारे ४३० मैलांचा कालवा खणावा लागेल. श्रीशैलम् पाणसाठ्यापासून गंगेचे पाणी पंपांच्या साह्यानी सुमारे ३०० फूट वर चढवावे लागेल. हे पाणी नंतर या ठिकाणा-

हून ७५० मैल लांबीच्या कंटूर कालव्यांनी कावेरी नदीच्या 'मेट्टूर' येथील पाणसाठ्यात सोडले जाईल. (एफ. आर. एल. + ७९६ फूट) कावेरी नदीच्या पात्रातून हे पाणी दक्षिण भारताच्या अत्यंत दक्षिणेकडील 'ताम्रपर्णी' नदीत सोडून तेथून तिचे दक्षिण सागराशी मीलन होईल.

कन्याकुमारीच्या खडकावरील स्वामी विवेकानंदांच्या स्मारकाइतकेच हे मीलन भव्यतर, दिव्यतम आणि वंद्य असेल. मानवी कर्तृत्वाच्या उच्चतेचे ते एक प्रतीक ठरेल. भारतीय ऋषिमुनींच्या कल्पित स्वप्नांचे ते दृश्य स्वरूप असेल.

वर नमूद केलेला प्रकल्पाचा आराखडा अत्यंत ढोबळ स्वरूपाचा आहे. भूपृष्ठीय नकाशे (टोपोशीटस्) विचारात घेऊनच हा आराखडा केला आहे. तरीही प्रकल्पाचे प्रत्यक्ष स्वरूप ठरविण्यासाठी भूपृष्ठीय नकाशांच्या अधिक सखोल पहाण्या, (सर्व्हेज्) हवाई पहाण्या, भूपृष्ठ व भूगर्भाच्या पहाण्या, जलशास्त्रीय पहाण्या सतत व अधिक चिकित्सेने कराव्या लागतील. मूळ प्रकल्पाला अनेक पर्यायी प्रकल्प तयार करावे लागतील. या व्यतिरिक्त इलेक्ट्रिकल एंजिनियरिंग शास्त्राशी संबंधित अशा अनेक अभ्यासपूर्ण पहाण्या हाती घ्याव्या लागतील. पंपिंग स्टेशन्सची उभारणी, विद्युतशक्तीची उपलब्धता, विद्युतनिर्मितीचे प्रकल्प यांचाही समावेश या प्रकल्पात करावा लागेल.

या शतकाच्या अखेरीस वाढीव लोकसंख्येच्या उदरभरणाचा विचार करता केंद्रसरकारला या प्रकल्पाच्या पहाणीस या दशकाच्या अखेरीस सुरुवात करावीच लागेल.या प्रकल्पाच्या प्राथमिक पहाणीसच १५०० ते २००० एंजिनियर्स लागतील, या व्यतिरिक्त इतर तंत्रज्ञ लागतील ते वेगळेच ! या सर्व तंत्रज्ञांना या कामी दहा वर्षे घालवावी लागतील. या प्रकल्पामुळे एंजिनियरिंग पदवीधरांची बेकारी फार मोठ्या प्रमाणात नष्ट होईल.

केंद्रीय पाटबंधारे मंत्री डॉ. राव यांची ही योजना अत्यंत महत्त्वाकांक्षी आहे. ते स्वतः जागतिक कीर्तीचे तज्ञ असल्यामुळे एकूण प्रकल्पच शास्त्रशुद्ध पायावर उभारला जाईल. गंगा दक्षिणवाहिनी करणे इतकाच या योजनेचा उद्देश नसून उत्तर, मध्य व दक्षिण भारतातील महत्त्वाच्या नद्या एकमेकींना जोडून बारमाही पाणीपुरवठ्यास उपयुक्त अशी प्रचंड जलसाखळी निर्माण करणे हा उद्देशही त्यात आहे.

गंगोत्री हे 'भगिरथतीर्थ' म्हणून समजले जाते. दक्षिण टोकाच्या 'ताम्रपर्णी' नदीच्या पात्रातून पवित्र गंगा ज्या ठिकाणी दक्षिण सागरास मिळेल तें ठिकाण 'डॉ. रावतीर्थ' म्हणून समजण्यास हरकत नसावी. या 'रावतीर्था'त आपल्याला स्नान करण्याचे भाग्य लाभो या व्यतिरिक्त आपण काय इच्छिणार ?

□ □ □

**[ डॉ. राव यांच्या लेखावर आधारित ]**

नलिनी अंबाडे

जय बांगलाचे निनाद ओसरू लागले तोच

# ' जय द्रविडनाड ' सुरू झाले !

मराठी पहिलीच्या पुस्तकात आम्हाला एक धडा होता. त्याला पानभर रंगीत चित्रही होते. त्या काळी पुस्तकांचे राष्ट्रीयीकरण झालेले नव्हते, म्हणून छान छान पुस्तके शाळांत असत. एक कोल्होबा रोज रात्री धोब्याच्या अंगणातील वेलावरील काकड्या फस्त करीत असत. कपड्यांच्या भट्टीशी गरम राखेत मस्तपैकी झोप काढून, पहाटेपहाटे पळून जात. एके रात्री कोल्होबा पाय घसरून तेथल्या नीळ घातलेल्या पाण्याच्या हौदात पडले. सकाळी पहातो तों सारे अंग निळे निळे. कावळे, चिमण्या सारे हसू लागले. कोल्ह्याने मग बतावणी केली, ' अरे, वनदेवीनं मला निळ्या आकाशातून पाठवलं आहे. आजपासून मी तुमचा राजा '–सर्वांना खरेच वाटले. नव्या राजाला सिंहासनावर बसविण्यात आले. दरबारात वाघोबा, सिंह, हत्ती अन् सारे पशुपक्षी जमले होते. नंतर मेजवानी सुरू झाली. पेरू पहाताच पोपट गाऊ लागला. सारेजण गाऊ लागले. काकडी पहाताच नवा राजाही गाऊ लागला, ' कुई कुई कुई '–तसे चाणाक्ष माकडाने ओळखले. तो ओरडून म्हणाला, ' अरे, हा कसला नवा राजा ? हा तर लब्बाड कोल्हा ! हाणा याला '–आणि कोल्ह्याला पळता भुई थोडी झाली !

वरील गोष्ट आठवायच काहीही कारण नाही. मला आपली सहज आठवण झाली म्हणून तुम्हाला सांगितली इतकंच ! आता आपले ' अय्यय्यो ! मदरास्स !! ' सदर सुरू. आज ह्या सदरात मी तुम्हाला राजपालयम् येथील अधिवेशनाचा वृत्तांत सांगणार आहे. ह्या वृत्तांताचा व वरील गोष्टीचा काहीही संबंध नाही बरं का !

बातमी म्हणून तुम्ही वाचलीच असेल, की जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात राजपालयम्–म्हणजेच तंजावूरजवळचा जुना राजवाडा–येथे सध्याच्या सत्तारूढ द्रमुक पक्षाचे अधिवेशन झाले. पक्षप्रमुख म्हणून मुख्यमंत्री श्री. करुणानिधी, सारे...

डॉ. करुणानिधी यांनी समारोप केला. सदर अधिवेशनाच्या प्रवेशद्वारावर दोन मोठ्ठी पोस्टर्स होती—अर्थात जवळजवळच ! एक मुजिबूर रहेमान यांचे व दुसरे डॉ. करुणानिधी यांचे. अर्थात यात वावगे तसे काहीही नव्हते म्हणा ! एकावरती उल्लेख होता, ' बांगला देश ' व दुसऱ्यावर होता, ' द्रविड देश '—म्हणजेच शुद्ध तमिळमध्ये ' द्रविडनाड ' ! अधिवेशन म्हटले, की तेथे भाषणांचा सुकाळ ! श्री. सी. चेहळीयन ह्या एम. एल. ए. यांनी जोरदार भाषण केले, की केंद्र सरकारने आता आपण होऊनच राज्य सरकारांना जादा अधिकार द्यावेत. वाटल्यास घटनेत दुरुस्त्या कराव्यात. पुढे जर आम्ही आमची जुनी मागणी, परत उच्चारली तर मग मात्र आम्हाला दोष देऊ नका.' त्यानंतर एम. एल. ए. श्री. एम्. रामनाथन् यांनी आव्हान केले, की पंतप्रधानांच्या घरासमोर आणि ससदेसमोर घटनेच्या होळचा केल्या पाहिजेत. सत्याग्रह करून तुरुंग भरले पाहिजेत. समारोपाच्या भाषणात पक्ष-प्रमुखांनी सांगितले, की ' राज्याला अधिक स्वातंत्र्य ' (STATE AUTONOMY) हे वास्तविक काहीही नवीन नाही. त्यामुळे केंद्राच्या कामाचा ताण कमी होईल व राज्ये प्रजेचे अधिक हित करू शकतील. विरोधी पक्षांनी मात्र विनाकारणच बाऊ करू नये. केंद्राशी आमचा हात मैत्रीसाठी सदैव पुढेच राहील. आम्ही फुटून कधीच निघणार नाही. देशाच्या ऐक्याला प्राधान्य प्रथम व दुसरे स्थान स्टेट अटॉनॉमीस ' त्याच अधिवेशनात अनेकांनी आपापल्या भाषणात करुणानिधींचा दक्षिणेचे ' मजिबूर रहेमान ' असा गौरवपूर्ण (?) उल्लेख केला. स्वतंत्र द्रविड देशाच्या मागणीची पोस्टर्स त्याच वेळी प्रथम गावात भितीवर लावण्यात आली होती.


तंजावूर घटनेला प्रखर विरोध कोणी केला असेल, तर तो केंद्रीय पोलाद मंत्री श्री. मोहन कुमारमंगलम् यांनी. सेलम येथे भाषण करताना जाहीरपणे त्यांनी सांगितले, की असा फुटीरपणा म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे व तो जर जाणूनबुजून राज्यकर्ते करत असतील तर तो खोडसाळपणा आहे. त्याच वेळी चंदीगढ येथे न्यायमूर्ती श्री. गजेंद्रगडकर यांनी, पंजाब विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात सांगितले की अशा मागणीमुळ केंद्र-राज्याचे संबंध तर दुरावतीलच पण विनाकारणच गैरसमज वाढत जातील. गजेंद्रगडकर सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश होते व सध्या लॉ-कमिशनचे अध्यक्ष आहेत. तरीसुद्धा ह्या दोघांवर केवढी टीका तमीळ वर्तमानपत्रांतून सध्या होते आहे ! गेल्या दोन महिन्यांत कोणतेही वर्तमानपत्र उघडा, त्यामधील वाचकांच्या पत्रव्यवहारात हाच विषय व प्रादेशिक स्वायत्ततेबद्दल उलट सुलट मते. इंग्रजी पेपरात उलट सुलट पत्रे प्रसिद्ध होतात, तर तमीळ पेपरांमध्ये फक्त सुलट !

ह्यावर ताण केली ती इ. व्ही. रामस्वामी नायकर यांनी ! त्यांचा परिचय ' माणूस 'ने तुम्हाला गेल्या वर्षी सेलम येथील नग्न देवतांच्या गाजलेल्या मिरवणुकी-बद्दल करून दिलेलाच आहे. त्यांचा मूळ पक्ष ' द्राविड कळघम '— त्या पक्षाची मते अतिशय जहाल व अतिरेकी उदा. तमीळ राष्ट्रभाषा हवी, मद्रास राजधानी हवी,

द्रविडांसाठी ' द्राविडनाड ' तोडून स्वतंत्र हवे, ह्या देशात उपरे आलेले आर्य, त्यांनी देश सोडून निघून जावे व सर्वांत भयानक घोषणा म्हणजे ' ब्राह्मणास दिसेल तेथे ठेचा '– अर्थात ह्यामुळच त्यांच्या पक्षाला समाजाच्या वरच्या थरात मुळीच प्रतिसाद मिळाला नाही व तो पक्ष नामशेष होऊ लागला. तेव्हा मात्र काही शहाण्या लोकांनी विचार केला की, आपण तत्त्वे बदलल्याचं निदान नाटक तरी केले पाहिजे. मग त्यांनी निळ्या पाण्यात उड्या घेतल्या व निळे झाले. मग म्हणू लागले, ' वनदेवीनं निळ्या आकाशातून आम्हाला पाठविलं आहे. आमचा नवा पक्ष ' द्राविड मुनेत्र कळघम ' आमचा व ' द्राविड कळघम्‌चा ' काहीही संबंध नाही.'

---

तामिळमधल्या पहिल्या क्रमांकाचा खप असणाऱ्या ' थंती ' दैनिकाच्या १९ फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध झालेले बोलके चित्र.



इंजिनावर द्रमुक लिहिलेले असून ड्रायव्हर आहेत करुणानिधी. इंजिनाने सोडून दिलेला डबा म्हणजे नवकाँग्रेस. वास्तविक केंद्रीय सरकार हे इंजीन व राज्यसरकारे म्हणजे डबे.

साडेचार लाख खपाचे ' थंती ' हे दैनिक एकाच वेळी टेलीप्रिंटरने सहा ठिकाणांहून प्रसिद्ध होते. या दैनिकाचे संपादक मिस्टर आदित्यन्‌ हे मुख्यमंत्र्यांचे नातेवाईक असून अमदारही आहेत.

---

१९६२ ते ६५ मध्ये हिंदी विरोधाचे भांडवल करून हा पक्ष सत्तेवर आला. तरी-सुद्धा मूळ ' द्राविड कळघम ' पक्ष लोपला नाहीच. त्या नायकरांनी गेल्या महिन्यात एक लेख ह्या ' स्टेट अटॉनॉमी 'बद्दल प्रसिद्ध केला. त्यामध्ये ते म्हणतात, ' जोवर ह्या असल्या राज्यकर्त्यांच्या (म्हणजे नेमके कोण ? ते मात्र अध्याहृत) जोखडा-तून बाहेर पडणार नाही. तोवर तमीळनाडूची खरी प्रगती झाली असे काही म्हणता येणार नाही '–अर्थात त्या लेखाचा रोख आहे खरा जातीयवादावर म्हणजेच आडूनआडून पुढारलेल्या अय्यर, अय्यंगार ह्या ब्राह्मणवर्गावर. ह्या लेखास ' तमीळ आरसू ' ह्या सरकारी पाक्षिकाने, खास प्रसिद्धी दिली. नुसतीच नव्हे, तर रामस्वामींच्या फोटोसह. हे खास सरकारी पाक्षिक तमीळ व इंग्रजी भाषेत निघते. सरकारी टेंडर, लॉटरी, नोकर भरती, विकास योजनांचा विकास, मंत्र्यांचेच ललित लेख (?) कथा, कविता ह्यात प्रसिद्ध होतात. तमीळनाडू सरकारच्या प्रसिद्धी खात्यास २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून खास ' वेल्ली विळा मालर ' विशेषांक फक्त तमीळमध्येच १ किलो वजनाचा २॥ रुपये किंमतीचा ऑफसेट तिरंगी – प्रसिद्ध केला. त्यामध्ये फोटोसह वरील लेख आहे. अर्थात इंग्रजी आवृत्तीत लेख नाही हे मात्र कशाचे सूचक समजावे ?

भारताचा ' आर्य चाणक्य कौटिल्य ' उर्फ चक्रवर्ती राजगोपालाचारी (वय ९४) यांनी आपल्या ' स्वराज ' पत्रात वरील मागणीचे वाभाडे काढताना लिहिले आहे. ' मुळात मागणी चूक नाही. चूक आहे ती मागणीची वेळ. देशात आणिबाणी, शत्रू दारात – भयंकर महागाई – प्रांतभर जिकडेतिकडे संप – करवाढीने जनता पिचलेली – एकेका मंत्र्याची लाखावारी इस्टेट – त्यामुळे मंत्र्यावरचा विश्वास उडालेला आहे. त्यांचा दुराग्रह व गुंडगिरी हिंदी विरोधाचे वेळीं दिसली आहेच. त्यांनाच जादा स्वायत्ता देणे म्हणजे अधिक लाचलुचपत व बजबजपुरी ! '

–तरीही एक मार्चला बजेट सादर करताना, डॉ. करूणानिधींनी पुन्हा ' संपूर्ण स्वायत्ततेची ' मागणी केलीच !

□

□ □ □




**जगात खळबळ उडवून देणाऱ्या एका खुनी इसमाच्या ५६ दिवसांच्या नाटयपूर्ण पाठलागाची कहाणी.....**

आठ जून १९६८. लंडनचा विमानतळ. सकाळच्या वेळी हवेत ओलसरपणा होता. नेहमीसारखीच धावपळ होती. लंडनहून ब्रुसेल्स येथे जाणारे विमान थोडयाच वेळात निघणार होते. प्रवासी वाट पहात विमानतळाच्या मुख्य इमारतीत ताटकळत होते.

स्कॉटलंड यार्डचा एक वरिष्ठ गुप्तहेर त्या दिवशी लंडनच्या बाहेर जाणाऱ्या विमानप्रवाशांची नावे वाचण्यात गर्क होता. एक नाव त्याने वाचले. तो तेथेच क्षणभर थांबला. आणि धावत पळत मुख्य इमारतीतील ब्रुसेल्स येथे जाणाऱ्या प्रवाशांच्या दालनात आला.

एका व्यक्तीकडे येऊन तो थांबला. ती व्यक्ती थोडीशी अस्वस्थ झाली. चेहऱ्यावरील भाव एकदम बदलले गेले. त्याने डोळ्यांवर गॉगल लावला होता. अंगात कातडी जाकीट होते आणि हातात रेनकोट होता.

**वसंत भणगे**

'कृपया माझ्याबरोबर तुम्ही खाली उतराल काय ?' तो स्कॉटलंड यार्ड गुप्तहेर त्या व्यक्तीला म्हणाला.

जगात खळबळ माजविणाऱ्या एका खुन्याला पकडून त्याच्या पाठलागाची सांगता होत होती. सामाजिक हक्कासाठी लढणाऱ्या आणि जनतेसाठी तन-मन-धन अर्पण करणाऱ्या मार्टिन ल्यूथर किंग या महान अमेरिकन निग्रोला त्या व्यक्तीने ठार मारले होते !

या पाठलागाची कहाणी ही एक रोमहर्षक कहाणी आहे. FBI या अमेरिकन गुप्त पोलीस संघटनेच्या कार्यक्षम यंत्रणेत या घटनेने एक नवा तुरा खोवला गेला. तिने या कामगिरीसाठी जवळजवळ दहा कोट रुपये खर्च केले. तीन हजार माणसांनी या शोधासाठी प्रत्यक्ष हातभार लावला. पाच लक्ष मैलांचा प्रवास केला गेला. जगातल्या सर्व राष्ट्रांच्या गुप्तहेर संघटनांना यात मदत करण्याची विनंती करण्यात आली. या खुनी व्यक्तीने पलायन करण्यासाठी चार राष्ट्रांमध्ये आश्रय घेण्याचा प्रयत्न केला. या कामगिरीचा इतिहास म्हणजे जिद्द, चिकाटी, आणि पैशांचा उदार वापर होता. हा प्रवास होता टेनसी राज्य, जॉर्जिया, कॅलिफोर्निया, अलबाना तेथून मेक्सिको, कॅनडा, पोर्तुगाल आणि ब्रिटन.

४ एप्रिल १९६८. संध्याकाळचे साडे पाच वाजले होते. टेनसी राज्यातले मेम-फिस हे शहर. त्या शहरातील एका प्रवासी हॉटेलच्या बाथरूममध्ये एक प्रवासी बराच वेळ दबा धरून बसला होता. कुणाला त्याची अजिबात कल्पना नव्हती. त्याच्यापाशी एक अति सामर्थ्यवान रायफल होती. त्याने ती लपवून आपल्याबरोबर आणली होती. त्यात डमडम गोळ्या भरल्या होत्या. मानवी रक्ताला स्पर्श करण्या-साठी त्यांचा उपयोग करण्यात येणार होता. त्याने बाथरूमचे दार व्यवस्थीत बंद केल्याची खात्री करून घेतली. रायफलचे तोंड खिडकीच्या थोडे बाहेर काढून त्याने आपली नजर बाहेर फिरविली. त्याच्या खोलीपासून दोनशे फूट दूर असलेल्या एका प्रवासी हॉटेलच्या गॅलरीत आपल्याजवळ असलेल्या दुर्बिणीतून त्याने लक्ष केंद्रित केले. त्या हॉटेलचे नाव होते 'लॉरेन हॉटेल.'

काटा सहावर सरकला. सहा वाजून एक मिनिट झाले. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग आपल्या हॉटेलच्या गॅलरीत आले नि रायफलचा खटका दाबला गेला. बेफाम वेगाने गोळी सुटली आणि क्षणार्धात डॉ. किंग खाली कोसळले ते परत कधी न उठण्या-साठीच. ज्याच्या हृदयाने मरतानाही कधी पाखरासारखी तडफड केली नसती अशा महात्म्याच्या हृदयाला भिडण्यासाठी डमडमसारख्या गोळीचा उपयोग करण्यात यावा हा केवढा दैवदुर्विलास होता !

त्या व्यक्तीने गडबडीने आपली रायफल कापडात गुंडाळली आणि ती छोट्या हँडबॅगमध्ये भरली. हॉटेलमध्ये सगळीकडे मंद प्रकाश होता. तो मुख्य हॉलमध्ये आला आणि त्याने तेथून गुपचुप पलायन केले. गोळी झाडल्याचा आवाज आणि

पांढऱ्या रंगाच्या गाडीचे भरधाव जाणे याची हॉटेलच्या मालकाला काहीशी शंका आली.

थोड्याच वेळात मेमफिस येथील FBI या अमेरिकन गुप्त संघटनेच्या कार्यालयातून फोन फिरला. डायरेक्टर एडगर हुअरनी हुकूम दिला, 'ज्या माणसांची आपल्याला मदत होईल असे वाटते त्या सर्व माणसांशी ताबडतोब संपर्क साधा.'

पहिल्या तासाच्या प्राथमिक तपासणीतच पोलिसांनी दोनशे फूटांवरून गोळी झाडली गेली आहे हे अचूक हेरले आणि ते त्या बाथरूममध्ये आले. त्या जागेची अतिसूक्ष्म तपासणी करण्यात यत होती. हॉटेलमध्ये सगळ्यांच्या मुलाखती घेण्यास पोलिसांनी सुरुवातही केली. मध्यरात्रीपर्यंत या घटनेचा संदर्भ लागल्यासारखा वाटला.

मध्यम वयाचा, बांधीव देहयष्टीचा आणि पिंगट केस असलेला जॉन विलार्ड हा माणूस खूनी असावा अशी पोलिसांनी खूणगाठ बांधली.

त्या हॉटेलच्या एका काळोख्या जिन्याच्या कोपऱ्यात पोलिसांना एक हँडबॅग सापडली. त्यात ३०.०६ ही रायफल, काही प्रसाधने आणि एक विजार सापडली. साधारण बारा तासांनी पहाटे सहा वाजता त्या रायफलवरील बोटांचे ठसे उतरवून घेतले. ती रायफल पुढील तपासासाठी प्रयोगशाळेत पाठवून देण्यात आली. तपासाची सूत्रे प्रचंड वेगाने हालत होती. पुढील दिवसांपर्यंत पोलिसांनी शोधून काढले, की अल्वाना येथील बकिंगहॅमच्या परिसरात असलेल्या एरोमरीन सप्लाय कंपनीत ती रायफल तयार करण्यात आली होती. आणि ३० मार्चला हार्वे लॅमेयर या माणसाने ती विकत घेतली होती. सोबत एक दुर्बीण आणि गोळ्यांची पेटी पण त्याच व्यक्तीला विकली गेली होती.

बराच वेळ लोटल्यामुळे त्या रायफलवरील बोटांचे ठसे स्पष्ट मिळू शकले नाहीत. त्यामुळे परत अडचण उपस्थित झाली. आणि त्या हॉटेलमधून गोळी झाडणारा जॉन विलार्ड किंवा प्रत्यक्ष विकत घेणारा हार्वे लॅमेयर या व्यक्तीभोवती परत रहस्य फिरत राहिले. आणि मोठीच अडचण उभी राहिली.

मेमफिस येथून ३३० मैलांवर असलेल्या अटलांटा जॉर्जिया येथे रहाणाऱ्या एका स्त्रीने FBI ला फोन करून आपण ही पांढऱ्या रंगाची मोटार पाहिल्याचे कळविले. हा खून झाल्यानंतर एक दिवसानंतर आपल्या घराच्या शेजारी एका इमारतीसमोर ही मोटर उभी असल्याचे तिने पाहिले होते.

FBI ने तेथे ताबडतोब धाव घेतली. त्या मोटारीची कसून तपासणी करण्यात आली. तिच्या खालच्या भागात हिरव्या रंगाचे दोरे सापडले. त्याच प्रकारचे दोरे FBI ला त्या हॉटेलमध्येही सापडले होते. थोडीशी जुळवाजुळव झाल्यासारखी वाटली.

मोटारचा बराचसा उपयोग होण्यासारखा होता. मागच्या वर्षी त्या मोटारने

मेक्सिको राज्यात प्रवास केला होता. एका सर्व्हिस स्टेशनच्या बिलावरून असे दिसून आले, की नुकतीच ती मोटर लॉस एन्जेल्स येथे सर्व्हिसिंगला ठेवण्यात आली होती. मोटरच्या नोंदणीवरून तिच्या मालकाचा पत्ता लागला. एरिक स्टार्वोगाल्ट २६०८ हायलँड अव्हेन्यु. बर्मिंगहॅम, अल्बाना.

हॉटेलमध्ये जी विजार सापडली होती, तिच्यावर लाँड्रीच्या खुणा मिळाल्या. देशातल्या लक्षावधी लाँड्र्यांपैकी कुठल्या लाँड्रीचा तो छाप असावा ! कपड्यांवर मारायच्या छापांच्या कंपनीसी संपर्क साधण्यात आला. एका कंपनीने त्या खुणा कुठल्या मशीनच्या साहाय्याने केल्या आहेत ते बरोबर ओळखले. लॉस एन्जेल्स येथील कुठल्यातरी लाँड्रीला ते मशीन विकले गेले होते.

आता दोन गोष्टींची छाननी करण्यासारखी होती. एक सर्व्हिस स्टेशन आणि दुसरी ती लाँड्री. तीनशे माणसे लॉस एन्जेल्स येथे कामावर पाठविण्यात आली. काम कष्टाचं तर खासच होतं.

' एरिक स्टार्वोगाल्ट याने बर्मिंगहॅम येथे नृत्याचे धडे घेतले आहेत तेव्हा अशी नृत्यगृहे जाऊन प्रत्यक्ष पहा, ' डायरेक्टर हुव्हर तेथल्या प्रमुख एजन्टास म्हणाले,

एक हेर समुद्रकिनारी असलेल्या एका नृत्यगृहात गेला. तेथे एरिकने नृत्याचे धडे घेतले होते. तो बुजरा असल्यामुळे विशेष कुणाच्या नजरेत भरणारी ती व्यक्ती नव्हती. FBI ने बरीच नृत्यगृहे नजरेखालून घालविली. आंतरराष्ट्रीय किर्ती असलेल्या एका नृत्यगृहास दोन हेरांनी भेट दिली. एरिकने तेथे सहा आठवडे शिक्षण घेतले होते. मागच्याच आठवड्यात तो पदवीधर म्हणून बाहेर पडला होता. तेथे सर्व पदवीधरांचे फोटो ठेवण्यात आले होते. मालकाने एक ग्रुप फोटो त्या हेरांपुढे ठेवून त्यातील एरिक कुठचा आहे ते दाखविले. तो फोटो घेऊन ते हेर वॉशिंग्टनला तात्काळ रवाना झाले.

हॉटेलमधील व्यक्ती आणि ज्याने बर्मिंगहॅम येथे रायफल घेतली होती त्या व्यक्तीत बरेच साधर्म्य दिसून आले. थोड्या अवधीतच FBI ने त्या व्यक्तीचे फोटो काढून ते दक्षिण कॅलिफोर्नियाच्या सर्व हॉटेल्स्, प्रवासी गृहे, बार आणि क्लबमध्ये पाठवून दिले. पुष्कळ लोकांनी त्या व्यक्तीस मागील वर्षभर लॉस एन्जेलसच्या समुद्रकिनारी पाहिले होते. बरीच माहिती बाहेर येऊ लागली.

गर्द रंगाचा सूट, त्यावर पांढऱ्या रंगाचा स्टार्च केलेला शर्ट, हिरवा टाय, करड्या रंगाचे बूट, बोटांची लांब नखे, समोरच्या माणसाच्या डोळ्याला डोळा देण्याचे टाळणे आणि बोलताना कानांना स्पर्श करणे. नोकरी नसलेला. तरी बरीच मोठी बिले भागविणारा तो माणूस आपणास माहीत असल्याचे एका वेश्येने सांगितले.

तो गरीब माणसासारखाच वागायचा. त्याला अतोनात पिण्याची सवय होती. नेहमी कमी किंमतीच्या बारमध्ये तो जायचा. त्याची बोलण्याची पद्धती सदोष होती. म्हणजे तो कमी शिकलेला होता, हे स्पष्ट होते. इतर व्यवसायात त्याला गती

नव्हती. पण गुन्हेगारीतच त्याला रस वाटत होता. तो हुषार नव्हता पण खोटं कसं बोलावं यात तो तरबेज होता.

एप्रिल महिन्याच्या मध्यापर्यंत FBI ने हव्या असलेल्या माणसाबद्दल बरीच माहिती गोळा केली. पण तो माणूस प्रत्यक्ष कसा आहे हे कुणालाच माहीत नव्हते. शिवाय तीच व्यक्ती आपणाला हवी आहे काय, याचे उत्तरही FBI जवळ नव्हते. लॉस एन्जेल्सवरून न्यू ऑर्लिन्सला प्रवास करताना एरिक आपल्याबरोबर असल्याचे एका गवयाने सांगितले. शिवाय त्या दिवशी किती तरी वेळा त्याने फोनचा उपयोग केला होता. असेही तो म्हणाला.

रॉयल कॅनडियन पोलीस खाते FBI ला मदत करत होते. त्यांच्या पोलीस दलाने एरिक १९६७ साली ज्या घरात रहात होता त्या घराचा पत्ता शोधून काढला. एरिकने त्या वेळी असे भासविले होते, की आपण 'एक्स्पो ६७' या जागतिक प्रदर्शनाच्या बांधणीच्या कामावर आहोत.

मेक्सिकन पोलीस खात्याने एरिक ऑक्टोबर महिन्यात पर्तो व्हलटी या ठिकाणी येऊन गेल्याच्या वृत्तास दुजोरा दिला.

ज्या वेश्येकडे तो जायचा तिचा पत्ता लावण्यात आला. एका माणसास तो सांगायचा, की मला घोड्यांच्या शर्यतीत विपुल पैसा मिळाल्यास मी फक्त दारू पिऊनच जगणार आहे. पण या केवळ भाकड कथाच होत्या, की काय याचा पोलिसांनाही पत्ता लागत नसल्यामुळे या रहस्याला वेगळेपणा येत चालला होता.

पोलिसांनी लोकांच्या मुलाखती घण्याचा सपाटा लावला. त्यांतून बऱ्याच मनोरंजक गोष्टीही बाहेर येत होत्या. ज्या हॉटेलमध्ये नेहमी हिप्पी मंडळी रहात अशा एका हॉटेलमध्ये एरिकला आलेली दोन पत्रे पोलिसांना आढळली. पोलिसांना सावध-गिरीने पावले टाकावी लागणार होती. कारण हवी असलेली व्यक्ती हातघाईवर येऊन पिस्तुलाचा वापर करण्याची शक्यता होती. त्या व्यक्तीला जिवंत पकडण्याची FBI ची खटपट होती. गुप्तहेर खात्याच्या माणसांनी त्या हिप्पी हॉटेलभोवती तळ ठोकला. कदाचित एरिक तेथे असण्याची शक्यता होती पण दोन दिवस वाट पाहूनही काही फायदा झाला नाही.

पण त्याने जी खोली भाड्याने घेतली होती त्या खोलीत एक छोटा टेलिव्हिजन, एक पुस्तक, काही नकाशे आढळून आले. त्यात एक अटलांटा येथील एका रस्त्याचा होता. त्या नकाशात पेन्सिलने चार ठिकाणी खुणा करण्यात आल्या होत्या. त्या रस्त्यावरच मार्टिन ल्यूथर किंग यांचे घर होते आणि कार्यालयही. त्या घरावर वर्तुळ काढण्यात आले होते. दुसऱ्या एका नकाशावर बोटांचे ठसे सापडले.

पण त्या नुसत्या बोटांच्या ठशांनी केवढा तरी मोठा प्रश्न उपस्थित केला. FBI पाशी ८२ लक्ष माणसांचे ठसे होते. पण पूर्ण आकारात आणि व्यक्ती प्रत्यक्ष हजर असल्यावर ते ठसे घेऊन आपल्या नोंदणीशी त्याची जुळणी करण्यास तज्ज्ञांना

केवळ एक मिनिट लागलं असतं. पण आता ती सोय नव्हती. सगळे ठसे प्रत्यक्ष तपासणे अतिशय महत्त्वाचे होते आणि त्याला कितीतरी कालावधी लागला असता.

पण FBI ने त्यातून मार्ग शोधून काढायचा प्रयत्न केला. ही व्यक्ती एकदा नाही तर बऱ्याच वेळा शिक्षा झालेली व्यक्ती असल्यामुळे अशाच व्यक्तींचे ठसे बाजूला करण्यात आले. पण परत प्रश्न उपस्थित झाला. कारण अशा व्यक्ती ५३,००० च्या बाहेर होत्या. मग ज्या व्यक्तींचे वय २५ ते ५० वर्षांच्या आत असेल अशाच व्यक्तींचा विचार करण्याचे ठरविण्यात आले. म्हणजे दोन हजार ठसे तपासावे लागणार होते. FBI च्या प्रयत्नशील माणसांनी ते काम व्यवस्थित पार पाडले.

१९ एप्रिल सकाळी ९.५० वाजल्यापासून काम अकस्मात थांबले. कार्ड नंबर ४०५९४२/ जी. जवळजवळ दोन हजार माणसांनी काळजीपूर्वक तपासले. नकाशावर ठसे मिळाले होते ते त्याच्याशी पूर्ण जुळत होते.

४०५९४२/जी या नंबरची व्यक्ती आहे तरी कोण? उत्तर आलं, जेम्स अर्ल रे'. जन्म १० मार्च १९२८, डाल्टन एलिनॉस, प्रत्येक गोष्टीत हार खाणारी ती व्यक्ती होती.

त्याच्या फाइलचा अभ्यास करण्यात आला. बरेच फसवणुकीचे आरोप त्याच्यावर होते. हत्यारबंद गुन्हे, लुटालूट, डाके अशांसारख्या गंभीर गुन्ह्यांत त्याला शिक्षा झाल्या होत्या. ताबडतोब पाचशे गुप्त पोलिसांना सगळी माहिती देऊन कामगिरीवर पाठवण्यात आले आणि आणखी माहिती जमविण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या.

मिसिसिपी नदीच्या काठी त्याचे कुटुंब रहात होते. त्याचे सारे आयुष्य गरिबीतच गेले. एका झोपडीत तो रहायचा. बऱ्याच वेळा त्याने शाळा सोडली होती. त्याला विशेष कुणी मित्रही नव्हते. एकाकी रहाणेच तो पसंत करी. दगड फेकण्यात तो तरबेज होता. चाकू चालविण्यातही त्याने बरीच प्रगती केली. भुरट्या चोऱ्या करायचा त्याला छंद जडला होता. लहानपणीच त्याची आपल्या कुटुंबाशी फारकत झाली. स्वतःच आपले पोट भरण्याचे त्याने ठरविले होते.

वयाच्या पंधराव्या वर्षी त्याने शाळेला रामराम ठोकला. १९४६ साली त्याची लष्करात भरती झाली. जवळजवळ अडीच वर्षे त्याला जर्मनीत काढावी लागली. त्याला अतिशय पिण्याची सवय होती आणि त्यामुळे त्याला बऱ्याच वेळा शिक्षा करण्यात आली. शेवटी त्याला, हा माणूस लष्करात केवळ निरुपयोगी असल्यामुळे काढून टाकण्यात आले. एलिनॉस येथील एका कारखान्यात त्याला नोकरी मिळाली पण तेथूनही त्याला हाकलण्यात आले. मग चक्क गुन्हेगारी धंद्याकडे त्याने आपला मोर्चा वळविला. पण त्यात तरी त्याला कुठं यश येणार होते!

लॉस एन्जल्स येथील एका कंपनीचा टाइप-रायटर त्याने चोरला. पण त्या गडबडीत तो आपले बँकेचे पासबुक त्या ठिकाणी विसरून आला. त्यामुळे त्याला सहज पकडण्यात आले होते.

दुसऱ्या एका गुन्ह्यात चोरी करून पळून जात असताना एका मोटरचा धक्का लागून तो खाली पडला आणि त्याला पकडण्यात आले. शिकागो शहरात दरोडा घालून पळून जात असताना पोलिसांच्या गोळ्यांनी तो जखमी झाला होता आणि सहज तो सापडला होता. मिसुरी येथील तुरुंगात त्याला त्या दरोड्याबद्दल शिक्षा झाली आणि तीही तब्बल वीस वर्षांची. दोन तीन वेळा पळून जाण्याचा त्याने प्रयत्न केला पण त्याला यश आले नाही. शेवटी १९६७ सालच्या एप्रिल महिन्यात एका बेकरीच्या गाडीतून पळून जाण्यात त्याने यश मिळविले.

आता FBI ने त्याचे नातेवाईक, हॉटेल्स, बार, गुत्ते, रेल्वे स्टेशन्ससारख्या ठिकाणांवर पाळत ठेवली. यापूर्वी एवढा खटाटोप करण्याची कधीच पाळी आली नव्हती. दिवस निघून जात असताना कामात बरेच शैथिल्य आल्यासारखे झाले.

FBI ची पूर्ण खात्री होती, की खुनी अमेरिकेतून निसटून गेला असेल. पण कुठून आणि कसा हा प्रश्न उपस्थित झालाच.

डायरेक्टर हुअरनी असा आडाखा बांधला, की त्या व्यक्तीने आपले नाव बदलून पासपोर्ट मागितला असला पाहिजे. शिवाय तो तुरुंगातून पळाल्यानंतर ही घटना घडण्याच्या कालावधीत साडेदहा लक्ष पासपोर्टस् देण्यात आले होते. म्हणजे परत सर्व पासपोर्टस्ची छाननी करण्याची अडचण आलीच. पण त्यासाठी FBI ला काही डगमगून चालणार नव्हते. या कामावर ८० माणसांची खास तुकडी रवाना झाली. त्यांनी हे सगळे पासपोर्टस् तपासायची कामगिरी पत्करली. रे याने जरी कदाचित आपले नाव बदलले असले तरी निदान त्याच्या फोटोवरून तरी त्याला हुडकून काढता येण्याची शक्यता होतीच.

व्हाइट हाऊसमध्ये या कामाची सुरुवात झाली. कुणाला कुणकुण लागू नये म्हणून काम रात्रीच्या वेळी सुरू करण्यात आले.

रॉयल कॅनेडियन पोलीस खात्यानेही यात विशेष लक्ष घालण्याची खटपट चालविली होती. हजारो पासपोर्ट नजरेखालून घालण्यात आले. काही पासपोर्टवर रे सारख्या दिसणाऱ्या व्यक्ती आढळून आल्या. पण ते खरे पासपोर्टस् होते. जवळ जवळ दोन लक्ष चाळीस हजार पासपोर्टस्चा विचार करण्यात आला.

शनिवार, १ जूनची सकाळ. एका हेराने एक पासपोर्ट बाजूला काढला. त्यावर नाव होते–रॅमन जॉर्ज स्नेड. त्याने त्या फोटोकडे क्षणभर पाहिले मात्र. डोळ्यांवर गॉगल लावलेली व्यक्ती दुसरी तिसरी कुणी नसून तीच होती.

क्षणभरात साध्या कपड्यातील दोन वरिष्ठ FBI अधिकारी त्या पत्त्यावर निघाले. टोरंटो येथील एक हॉटेल. स्नेड चारच आठवड्यांपूर्वी तेथे होता. तेथील बाईने माहिती दिली, की हा गृहस्थ रात्रभर जागाच असायचा आणि सारा दिवस झोपून काढायचा. त्याच्या इतर कागद पत्रांवरून असे आढळून आले, की २ मे रोजी त्याने 6 BOAC – FLIGHT 600साठी लंडन परतीचे तिकिट काढले होते.

६ जूनची सकाळ. FBI च्या मुख्य कचेरीत महत्त्वाचे कागदपत्र तयार करण्यात येत होते. कुणाला कुणकुण लागू नये म्हणून त्यांची एकच प्रत तयार करण्यात आली होती आणि ती माहिती केवळ सहा माणसांपुरतीच मर्यादित होती. FBI च्या हस्ताक्षर तज्ज्ञांनी असा निर्वाळा दिला, की स्नेड ही व्यक्ती दुसरी तिसरी कुणी नसून जेम्स अर्ल रे हाच आहे. लंडनच्या स्कॉटलंड यार्डकडून बातमी आली, की रे लंडनला उतरल्यावर आपले तिकीट बदलून तो पोर्तुगालला रवाना झाला आहे. आता तज्ज्ञ माणसांनी असा कयास केला, की तो युरोपात कुठेतरी दडून असेल. आफ्रिकेत तो गेला असल्यास त्याला हस्तगत करणे शक्य होणार नव्हते.

हुअरनी दोन FBI एजंट लिस्बनला पाठवले. युरोप खंडातील सर्व गुप्त पोलीस-खात्यांना अशी विनंती करण्यात आली की जो, कोणी रॅमन जॉर्ज स्नेड या नावाने वावरत असेल त्याला ताबडतोब पकडून ठेवावे. आता थांबून वाट पहाण्याशिवाय FBI ला काही विशेष करता येणार नव्हते.

आठ जून. सकाळचे सव्वासात वाजले होते. वॉशिंटन FBI च्या मुख्य कचेरीत फोन खणखणला. ' ब्रिटनच्या स्कॉटलंड यार्डने स्नेड या माणसाला पकडून ठेवले आहे. ती व्यक्ती लंडनच्या बाहेर जाण्याच्या विचारात आहे. FBI च्या लंडन एजंटाला त्याच्यापाशी भरलेले पिस्तुल असल्याचे सांगण्यात आले.

कॅनन रोड येथील पोलीस स्टेशनवर स्कॉटलंड यार्डच्या दोन प्रमुख अधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीला बरेच प्रश्न विचारायला सुरुवात केली. आपले नाव रॅमन जॉर्ज स्नेड असल्याचे सांगून आपण कॅनडियन असल्याचे त्याने सांगितले. त्याच्या हाताचे ठसे घ्यावयाचे ठरविल्यास लंडन कोर्टाच्या साक्षीने ते करावे लागले असते. कारण इंग्लंडमध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याच्या बाबतीत तशी अट आहे आणि तसे करायचे ठरविल्यास त्यात बराच वेळ जाण्याची शक्यता होती. मग त्या व्यक्तीला पाणी पिण्यास देऊन त्या ग्लासवरील ठसे ताबडतोब प्रयोगशाळेत पाठवून उतरवून घेण्यात आले.

११–२० वाजता लंडन FBI एजंटाने वॉशिंग्टनमध्ये ते ठसे तपासून पहाण्यास सांगितले.

काही वेळातच FBI च्या प्रमुख कचेरीतून सर्व ठिकाणी सांगण्यात आले की हा तपास आता बंद करावा. कारण लंडनच्या विमानतळावर खुनी माणसास पकडण्यात यश आले आहे.

एक इतिहासप्रसिद्ध पाठलाग त्या दिवशी संपला होता. ◻ ◻ ◻

[ लंडन टाईम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या जरेमी ओलरी यांच्या लेखाचे रूपांतर ]

# बंधमुक्त

"मी आनंदी आहे,
खरोखरच तुमचा अरू सुखी,
आनंदी आहे !"

**चंद्रकांत देशमाने**

खोदाद सर्कलवरील 'फार्मर ब्रदर्स'मधील माझे नेहमीचेच कोपऱ्यातील टेबल. मंद शब्दही फिका पडावा अशी फिकट-अंधुक प्रकाशयोजना. त्यामुळे निर्माण झालेले धीरगंभीर, प्रशांत वातावरण ! अशा संथ वातावरणात मीही स्तब्धपणे बसलेला. एकटाच, नेहमीप्रमाणे !

एकटा कसा ? माझ्या जोडीस नेहमीची 'कॅप्स्टन' आहेच की. ऑफिस सुटल्यानंतर घरी यायचे ते लागलीच बाहेर पडण्यासाठी ! बाहेर पडल्यावर मित्रमंडळींना टाळून, केवळ कॅप्स्टनचा भरलेला पॅक हाताशी ठेवून रोजची संध्याकाळ या 'फार्मर ब्रदर्स'मध्ये येथे, याच टेबलाशी घालवायाची हा माझा नित्यक्रमच होऊन बसला आहे.

घरातील सर्वजण व बाहेरचे मित्रजनही मी 'बदललो' आहे म्हणतात. मला पूर्ववत् आनंदी पाहण्याचा हव्यास बाळगून आहेत–हो, हव्यासच नाहीतर काय ? महतप्रयासानेही आताशा ते मला जमत नाही. केवळ त्यांच्या समाधानाखातर बाह्यत: हसतमुख, आनंदी दिसावे म्हटले तर तेही जमत नाही. तसा प्रयत्नही करून पाहिलाय. परंतु आवाक्याबाहेर असलेल्या गोष्टी करण्याची धडपड माणसाने कधीच करू नये. तसे करण्याने साधत तर काहीच नाही, मात्र मोठी शोचनीय स्थिती निर्माण होऊन बसते.

माझ्या मन:स्थितीस अनुरूप वातावरण मी येथे पाहिलंय ! निर्जीव, निश्चल !



पण अशा पार्श्वभूमीवरही कित्येकदा आजूबाजूचा गलबला व हसणे खिदळणे भेसूर वाटते. चालताना अधेमधे खाचखळगे लागावेत तसे !

खरोखरच सिगरेटने साथ दिलीय मला. तुझ्यानंतर तीच माझ्या जोडीस आहे वसुधा ! कधीही माझ्यापासून हिरावली जाणार नाही अशी...

एकामागून एक धुम्रवलये.. ती आकार घेतात. आकार घेताना साकार झालेली दिसतात न दिसतात तोच हवेत विरतात. खळकन् फुटणाऱ्या काचेसारखी...

मी नुसती धूम्रवलये पाहात नाही वसू ! ह्या वलयात दिसणारा तुझा तो चेहरा —माझे एके काळचे सर्वस्व—न्याहाळीत असतो. माझ्याकडे पाहून हसत असलेला...

ते हास्य लोप पावत जाते व शेवटी पंचतत्वात विलीन होते—

पुन्हा वलये...हसणारा गोंडस चेहरा...त्यातील भावूक डोळे...!

दुसरी सिगरेट, तिसरी...चौथी.. !

—तुझी माझी ताटातूट झाल्याला दोन वर्षे झाली वसू ! त्यावर दैवानं अद्याप आपली भेट घडवून आणलीच नाही. किती निष्ठूर आहे दैव ? नव्हे नव्हे एका परीने ते दयाळूच आहे. जखमेची खपली निघून भळभळा रक्त वाहण्यापेक्षा नुसत्या जखमेची वेदना सहन करणे बरे !

ते दिवस विसरणे कसे शक्य आहे ?—माझ्या आयुष्यातील रम्य, सोनेरी दिवस ! मनास धुंदविणारे , स्वप्नात डुंबावयास लावणारे दिवस.. प्रीतीच्या राज्यातील

आपले परिभ्रमण, ती गोड हुरहूर, अनुकंपा, हळव्या शपथा नि उत्तुंग मनोराज्ये...!

पुरात नदीच्या पाण्यास ओढ असते, प्रीतीचेही तसेच आहे. या ओसंडणाऱ्या प्रीतीच्या प्रवाहात आपण वाहवत गेलो. किनारा गाठण्याचे भानच राहिले नाही. ती जाणीव होण्यापूर्वीच आपण भोवऱ्यात सापडलो होतो...

घरच्या मंडळींचा विरोध ! आपल्या विवाहास माझ्या घरून तीव्र विरोध झाला. तसे पाहिले तर कोणत्याच बाबतीत मला घरी कधी विरोध होत नसे. एकुलता एक म्हणून लहानपणापासून लाडात वाढलेलो ! पण या बाबतीत माझा हट्ट अनाठायी ठरला. त्यांच्या कर्मठ वृत्तीस आपला आंतरजातीय विवाह पचणारा नव्हता. माणसाची मूलप्रकृती बदलण्याचे सामर्थ्य शिक्षणातही नाही हेच खरे ! अत्यंत मूलगामी स्वरूपाचा असा हा विरोध होता.

तो विरोधकांचा विरोध नव्हता गं ! तशा विरोधाला मी कधीच भीक घातली नसती. तो होता माझ्यावर प्राणापलीकडे प्रेम करणाऱ्या, मला फुलाप्रमाणे जपणाऱ्या मातापित्यांचा विरोध ! अबोल व म्हणूनच मारक ठरणारा विरोध !

एखाद्या विजयी सम्राटावर साखळदंडात जखडून पडायची वेळ यावी तद्वतच माझी विचारसंहिता मर्यादेच्या बंधनात बद्ध होऊन पडली. काय करावे काही सुचेनाच. एकीकडे जन्म दिलेले आई-वडील व दुसरीकडे माझ्या जीवनात प्रीतिवेल फुलविणारी वसुधा ! हे की ते ? मी भांबावलो. सागराच्या लाटा किनाऱ्याच्या तटबंदीवर आदळून परत सागरात विलीन होतात—पुन्हा किनाऱ्यावर आदळण्यासाठी ! तसे माझे मन आंदोलत होते. प्रसंग मोठा नाजूक होता व त्याची उकल करणे कठीण होते, तुला हे सारे कसे सांगावे, मला समजेना.

नेमक्या याचवेळी तुझ्याघरी तुझ्यासाठी वरसंशोधनास सुरुवात झाली. तू याची कल्पना मला दिलीस. आता मात्र मी पूर्ण कातवलो. अगतिक बनलो.

तुझ्यापुढे सारे स्पष्ट करावे लागले. तू प्रसंगाचे गांभीर्य ओळखलेस, माझ्याप्रमाणे विद्ध झालीस, कष्टी झालीस. पुढे काय करायचे ? दोघांनाही मार्ग दिसत नव्हता. नीती व संस्कृतीची मूल्ये जपणे हा आपणा दोघांचाही स्वभावधर्म होता. त्यांचा त्याग करून काही साध्य करणे ही गोष्ट आपल्या कोशातच नव्हती.

आपल्या भेटी घडतच होत्या. परंतु काही बोलण्याऐवजी आपण नुसते गप्पच बसत असू. मूक रुदनच जणू !

अखेर व्हायचे ते झाले ! तुझ्यासाठी उत्तम स्थळ प्राप्त झाल्याने तुझ्या घरून विवाहाची घाईही करण्यात आली.

भांबावलेल्या मन:स्थितीत अगतिक होऊन तू बोहल्यावर चढलीस. आणि मी—?

—आकाशात स्वैर विहरणाऱ्या पक्षाचे पंख तुटून तो खोल खोल गर्तेत कोसळावा त्याप्रमाणे मी दुःखाच्या खाईत लोटला गेलो होतो...

मनावरील हा घात सहन करणे माझ्या आवाक्याबाहेरचे होते. माझा सारा

जीवनपथच बदलला होता. ज्या आई-अण्णांनी माझ्या कल्याणासाठी प्रयास केले. त्यांच्यावर मी दुःखी व खिन्न झालेला पाहण्याची वेळ आली. मी तरी काय करणार? नैराश्याने मी पिचलो होतो. तो माझा स्थायीभाव झाला होता.

अचानक विचारांची शृंखला तुटते. आजूबाजूचा वेध घेणारी माझी नजर समोरच्या जोडप्यावर स्थिरावते. नवपरिणीत युगुल असावे ते! त्यांचे लाडिक, गोड कूजन चालू असते...माझी दृष्टी वळते, शून्यात गुरफटते! मन भिरभिरते, "दैवाने खैर केली असती तर आपणही या ठिकाणी वसूबरोबर–"

स्स ऽ! मी कळवळतो, भानावर येतो.

संपलेले थोटूक झटकन् 'ॲशट्रे'मध्ये फेकून–चटक्याने हुळहुळणाऱ्या बोटांवर फुंकर घालतो. आठवणींचा प्रवास पुढे सुरू होतो...

दरम्यानच्या काळात माझ्या लग्नासाठी प्रयत्न केले गेले. परंतु मी त्या बाबतीत पूर्ण उदासीन होतो. आई-अण्णांची डाळ शिजू शकली नाही. आताशा तर त्यांनी धीरच सोडला आहे. माझ्या लग्नासाठी त्यांना शब्द काढता येत नाही व माझी ही अशी स्थिती! त्यांना हे उघडचा डोळ्यांनी पाहणे कठीण जात असेल. झालेली चूक कळून आली असेल त्यांना! पश्चात्तापाच्या आगीत होरपळत असतील बिचारे!

झाकळलेल्या स्मृतींनो मन ओथंबून गेलंय–भावनेच्या नानाविध छटांनी अंतःकरण विद्ध झालंय. या पाशवी, ऐहिक जगाचा तिटकारा वाटू लागलाय. नातेवाईक, मित्रमंडळी, इमारती, झाडे, मोटारगाड्या...साऱ्या सजीव व निर्जीव वस्तू असंबद्धपणे आपल्याभोवती फेर धरून नाचत आहेत, आपणास वाकुल्या दाखवताहेत असा भास होतोय. जणू सारा आसमंत खायला उठलाय. जगण्यात कसलेच गम्य वाटत नाही. शाई नसलेल्या पेनप्रमाणे जीवन रुक्ष, नीरस नि तितकंच निरुपयोगी वाटतंय.

वसू, तू जरी मला दुरावली आहेस तरी तुझी आठवण स्वस्थ बसू देत नाही. तू कोठे असशील? कशी असशील? सुखी असशील की?–की माझ्यासारखीच...

नाही वसू–तू दुःखी असता कामा नयेस. तू जेथे असशील तेथे खूप खूप सुखी, आनंदी असावीस. तुझ्या सुखातच माझे सुख सामावलेले आहे. अजूनही कुठल्याश्या बंधनाने मी तुझ्याशी निगडित आहे. तुझ्या बाबतीत माझ्यावर काही जबाबदारी आहे असं वाटतंय. तू पूर्ण सुखात आहेस हे मला कळलं तर माझं औदासिन्य कोठल्याकोठे पळून जाईल.

मी नवी सिगरेट शिलगावतो. पुन्हा वलय...वलयावगुंठित हास्यवदन...नजरेने ते मी पिऊन टाकतोय...धूम्रवलय लोप पावतंय...पावलेही. आणि हे काय? तुझा 'तो' चेहरा मात्र अजूनही तेथेच? उलट तो जवळजवळ येतोय. काय वसू तू! मी बावचळतोच. होय वसू तूच येत असतेस. क्षणभर स्वतःच्या नेत्रांवर माझा

विश्वास बसत नाहीय. जणू श्वास रोखला गेलाय...

तू दारातून आत येत आहेस, तेच डौलदार चालण. तेच हसरे, भावूक डोळे !

तुझी तनुलता थोडीशी तुंदिलच झाली आहे, पण त्यामुळे तुझ्या मूळच्या सौंदर्यात भरच पडली आहे.

तुझ्याबरोबर...बहुतेक तुझे पतिराजच आहेत ते ! तुझ्या कडेवर तुझा 'छोटा'ही आहे. तुम्ही माझ्या शेजारच्या टेबलाशीच येऊन बसला आहात.

माझी दृष्टी एकवटून मी तुझ्याकडे पाहात आहे. तुझ्या चेहऱ्यावर फुलेच फुले फुललेली आहेत, रसरशीत आनंदी चेहरा ! कान केवळ तुझेच बोलणे-छे गुंजारव टिपताहेत. तुझे पतिराजांशी चाललेले हितगूज ! पूर्वीचेच मार्दवयुक्त बोलणे, मधात बुडवून काढलेले शब्द !


मी गहिवरतो ! एवढ्या कालावधीनंतर तुझं 'कुशल' कळतंय व तेही प्रत्यक्ष तुझ्याकडून ! आनंदाच्या लहरींनी काया थरथरतेय.

तू आता आई झाली आहेस. तू तुझ्या बाळास कुरवाळते आहेस, त्याचे पापे घेते आहेस ...

नकळत माझे नेत्र पाणावतात...हे आनंदाश्रू आहेत वसू ! तू सुखी आहेस, आनंदात आहेस याची ग्वाही मला मिळालीय. मला आणखी काय पाहिजे ? मला तुझे कोमल, हळवे मन माहीत नाही का ? परंतु 'ते' सारे काही बाजूस ठेवून तू पतिराजांशी एकरूप झाली आहेस. खऱ्या अर्थाने पत्निधर्माचे पालन करीत आहेस. वसू, खरोखर धन्य आहे तुझी !

पेय संपवून तुम्ही उठता. तुझ्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी अनिमिष, चिंब नेत्रांनी पाहात असतो – अतीव समाधानाने ! आज खूप दिवसांनी तृप्तीत बुडालोय ! जलपानास आसुसलेल्या धरतीवर वर्षेची मुक्त बरसात व्हावी ना ? तसे. नव-पल्लवांनी वृक्ष मोहोरून जावा तसा नवचैतन्यात मी न्हाऊन निघालोय. आज खऱ्या अर्थाने मी मुक्त झालोय, बंधमुक्त-! घरातील सर्वांना, मित्रांना मी ओरडून सांगणार आहे,

"मी आनंदी आहे, खरोखरच तुमचा अरू सुखी, आनंदी आहे !"



चंद्रशेखर मराठे



# माओ क्रांतीचे चित्र आणि चरित्र

रा. म. शास्त्री

## धूसर प्रदेशातील एक प्रदीर्घ यात्रा

श्री. वि. ग. कानिटकर (रा. म. शास्त्री) हे एक अफाट ताकदीचे लेखक आहेत. त्यांचे 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' हे पुस्तक मराठीतील मोजक्या आणि चांगल्या पुस्तकांच्या यादीत जाऊन बसले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या 'होरपळ' या नवीन कादंबरीस राज्य सरकारचे पारितोषिक मिळाले आहे. वैचारिक व ललित अशा दोन्ही प्रकारच्या लिखाणात ते सारख्याच कौशल्याने वाचकाला आनंद देतात आणि त्यांना स्वतःलाही या दोन्ही क्षेत्रांचे मनस्वी आकर्षण आहे.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या चीनविषयक ग्रंथात त्यांच्या लेखणीची सर्व वैशिष्टये पुन्हा एकदा स्पष्टपणे जाणवतात. 'माओ क्रांतीचे चित्र आणि चरित्र' हे ते पुस्तक असून, त्यामध्ये अर्वाचीन चीनचा इतिहास कालानुक्रमे ग्रथित केला आहे. ५०० पृष्ठांच्या या प्रचंड ग्रंथात त्यांनी चीनच्या इतिहासातील कालखंड जिवंत केले आहेत व प्रमुख व्यक्ती व प्रेरणा साकार केल्या आहेत. मराठी भाषेत चीनविषयक साहित्य फारच थोडे आहे हे लक्षात घेता कानिटकरांचा हा प्रयत्न अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. कोठेही कंटाळा न येता व आपण काहीतरी जडजंबाल वाचतो आहो असे न वाटता वाचक हा ५०० पानांचा प्रवास सहज करू शकतो. या सहजपणात कानिटकरांच्या बोलक्या, मार्मिक, पल्लेदार शैलीचा फार

मोठा वाटा आहे हे मान्य करावयास हवे. कानिटकर आपल्या वर्ण्यविषयाशी बोलता बोलता एकरूप होतात व जसजसे प्रसंगांचे चलच्चित्र सरकत जाते तसतशी त्यांची शैली निरनिराळी रूपे धारण करते. ऐतिहासिक विषय मनोरंजक करण्यात व त्याला मानवी परिमाण देण्यात कानिटकर वाकबगार आहेत.

'माओ क्रांतीचे चित्र आणि चरित्र' हा रूढार्थाने इतिहास नव्हे. कानिटकरांमधील ललित लेखक इतिहासाच्या चौकटीत बखरीचे चटकदार व चंचल असे रंग भरतो. पण ही केवळ चीनची बखरही नव्हे. हे खास शिवरामपंती थाटात केलेले अन्योक्तिपूर्ण व क्वचित प्रसंगी वक्रोक्तियुक्त असे चीनविषयक 'वाङ्मयीन आख्यान' आहे. म्हणजे असे, की पूर्वीचे कीर्तनकार जसे एखाद्या पौराणिक कथेच्या आधारे सद्यःस्थितीवर टीकाटिप्पणी करीत त्याप्रमाणे कानिटकर आपल्या चीनच्या आख्यानात, तिकडील प्रसंगांच्या अनुरोधाने भारतीय इतिहासावर व वर्तमानावर खास कानिटकरी टीकाटीप्पणी करतात. हीच पद्धत त्यांनी 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' यामध्येही वापरली होती. ग्रंथनिर्मितीच्या प्रस्थापित प्रथेनुसार असे विषयांतर करणे बरोबर आहे किंवा नाही हा प्रश्न बाजूस ठेवला, तर या पद्धतीचा काही फायदाही आहे हे नाकारता येत नाही.

वाचकाला पूर्णपणे माहीत असलेल्या अशा देशी घटना व व्यक्ती यांचा संदर्भ थोडयाशा मिष्किलपणाने त्याला देत राहिल्याने वाचक, अशा मूलतः परकीय विषयावरच्या पुस्तकाशी अधिक समरस होतात हे उघडच आहे. अन्यथा चीनचा एवढा प्रदीर्घ इतिहास वाचक न कंटाळता वाचू शकणार नाहीत. आपले निवेदन अधिक रोचक करण्यासाठी कानिटकर शाब्दिक कोटया व अनेक करामतींचा वापर करतात. अनपेक्षित असे साम्य-विरोध वाचकाला जाणवून दिले, की तो खूष होतो हे ते जाणून आहेत. 'सर्व चिन्यांचा गणवेष सैलसर असला तरी त्यांची मने करकचून बांधून टाकण्यात आली आहेत.' हे वाचल्यावर वाचकाला अर्थातच गंमत वाटते. चीनमधील एक राजा वारला व त्याचा वारस अगदी लहान होता हे सूचित करताना लेखक म्हणतात, 'त्याला मिसरूड फुटण्यापूर्वीच त्याचे सिंहासन फुटणार होते.' चीनच्या प्रदीर्घ अशा इतिहासातील यादवी, कारस्थाने, कत्तली, आक्रमणे व प्रतिकार यांचे वर्णन करताना त्यांच्या लेखणीला निराळीच धार चढते. तसेच चिनी इतिहासातील प्रमुख व्यक्ती–सन-यत-सेन, चँग-कै-शेक, राजमाता येहोनाला, चायना गार्डन, लि-ता-चाओ, मादाम चँग व नंतरची साम्यवादी प्रभावळ–यांचे वर्णनही त्यांनी ओघवत्या भाषेत केले आहे व त्यांना पुस्तकांच्या पानांत पुन्हा जिवंत करण्यात यश मिळवले आहे.

## यात्रानुभव

हे पुस्तक वाचीत असताना एखाद्या अनोळखी व धूसर प्रदेशाच्या प्रदीर्घ यात्रेवर आपण निघालो आहोत असा वाचकाला अनुभव येतो. खूप माणसे, खूप प्रसंग, खूप

मोठा विस्तीर्ण प्रदेश यांना गवसणी घालण्याची लेखकाची धडपड जाणवते. पुस्तक वाचून झाल्यावर एक प्रकारचा अनामिक थकवा जाणवतो पण त्याचबरोबर यात्रेवरून अनेक अनुभव घेऊन आल्याचे समाधानही मन भरून टाकते. प्रत्यक्ष माओ रंगमंचावर येईपर्यंतच्या घडामोडींसाठी कानिटकरांनी १८८ पृष्ठे खर्ची घातली आहेत, याचे कारण त्यांना माओ क्रांतीची पार्श्वभूमी पुरेशा व्यापक व सखोल प्रमाणात उभी करण्याची जरूर वाटली. त्याचप्रमाणे माओ-क्रांतीच्या धडपडीच्या, अपयशाच्या आणि यादवीच्या काळासाठी कानिटकर यांनी २६९ पृष्ठे योजिली आहेत. माओ क्रांती सत्ताधिष्ठित झाल्यानंतरच्या काळासाठी ते केवळ ६४ पानेच देऊ शकले आहेत. याची कारणे काही असली, तरी या पृष्ठवाटपाचा परिणाम असा होतो, की ज्या घटनेबाबत आपण इतकी पाने वाचली, ती घटना घडून गेल्यावर पुढे काय झाले, कसे झाले हे मात्र आपणास कळले नाही अशी वाचकाची भावना होते.

आपल्या पुस्तकाची वरीलप्रमाणे विभागणी करावी असे कानिटकरांना का वाटले याचा अंदाज करणे अवघड नाही. माओ क्रांती ही किती प्रखर विरोधी प्रेरणांशी टक्कर देऊन यशस्वी झाली हे त्यांना आपल्या वाचकांच्या मनावर ठसवायचे आहे. केवळ या एका कारणामुळेच आपण माओ क्रांतीचा आढावा घेण्याचे काम हाती घेणे जरूर आहे असे त्यांना वाटते.

एवढ्या विरोधातून स्थिरावलेली क्रांती तेवढीच भक्कम असणार असे त्यांना सुचवावयाचे असून चिनी क्रांती ही एक वस्तुस्थिती आहे व प्रचारी मार्गांनी तिचे स्वरूप बदलणार नाही अशी त्यांची भूमिका आहे. प्रत्येक लेखकाला आपण अमुकच विषय का निवडला याचे काही समर्थन द्यावे लागते. पण हे समर्थन बहुधा थोडक्यात असते. कानिटकरांचा वर्ण्यविषय चीन असल्याने त्यांना आपल्या पुस्तकाची संपूर्ण घडणच समर्थनात्मक करावी लागली हा भारत-चीन संबंध ज्या अवस्थेत आहेत त्या अवस्थेचा एक परिणाम आहे.

कानिटकर हे वर्ण्यविषयाशी शैलीच्या दृष्टीने व थोडेफार बौद्धिक दृष्टीने समरस झाले असले तरी त्यापलीकडे त्यांना जाता आलेले नाही व हे स्वाभाविकच आहे. चीनबद्दल सर्वसामान्य भारतीयांचा एवढा दारुण अपेक्षाभंग झाला आहे, की चीनच्या कोणत्याही यशाकडे फार उत्साहाने पाहणे भारतीय मनाला यापुढे शक्य नाही. कानिटकरांनी हा अडथळा ओलांडून चिनी इतिहासात बराच संचार केला हे त्यांना भूषणावह आहे. पण मुळात वर उल्लेखिलेला मानसिक अडथळा त्यांच्या बाबतीतही कायम आहे हे सबंध पुस्तक वाचल्यावर जाणवतेच. किंबहुना, त्यांचा हा संघर्ष सबंध पुस्तक व्यापून राहिला आहे.

माओ क्रांती यशस्वी झाली आहे हे नाकारता येत नाही. पण ती ज्या मार्गाने यशस्वी झाली त्या मार्गाने सतत यश मिळणे शक्य नाही. या परस्परविरोधाचा उल्लेख त्यांच्या पुस्तकातच आढळतो. एके ठिकाणी ते म्हणतात, ' शस्त्राशिवाय सत्ता मिळणे शक्य नाही, सल्तनत लोहेसे चलती है, जगात तेच राष्ट्र मोठे ठरते


की जे शस्त्र संपन्न असते.' तर दुसऱ्या ठिकाणी ते म्हणतात, की "जनतेचे मन आणि मस्तक ही दोनच ठिकाणे अशी आहेत की जेथे शस्त्रांचे बळ पोचू शकत नाही." माओ क्रांतीचे सशस्त्र यश आणि तितकेच सशस्त्र शासन यांच्या यशाचा उलगडा मात्र ते करू शकत नाहीत. यामुळे कम्युनिस्ट क्रांतीच्या यशाबद्दल त्यांच्या मनात काही अस्वस्थता आहे. खरी गोष्ट अशी, की राष्ट्रांतर्गत व्यवहार पाहता कोणतेही शासन जनतेच्या पाठिंब्याशिवाय राज्य करू शकत नाही व राष्ट्राराष्ट्रांतील संबंध पाहता कोणतेही राष्ट्र शस्त्राशिवाय जगू शकत नाही. शस्त्रसामर्थ्याच्या या मर्यादा व अनिवार्यता याबाबत कानिटकर यांनी अधिक स्पष्ट दिग्दर्शन केले असते तर बरे झाले असते.

## अंतर्विरोध

चीनमधील साम्यवादी राजवटीने काही क्षेत्रांत यश मिळवले आहे हे नमूद करून कानिटकर पुढे असे सूचित करतात, की या यशासाठी द्यावी लागणारी किंमत फार भयानक आहे. विचारशून्यता ही मरणाहून भयंकर अवस्था आहे असे त्यांचे विधान आहे. या सर्व मूल्यमापनात कानिटकर त्यांच्या व्यक्तित्वातील वैचारिक अंतर्विरोधापुढे हतबळ झाले आहेत. समाजात शिस्त हवी, चांगले शासन हवे, जनतेच्या प्राथमिक गरजा भागाव्यात असे एक बुद्धीवादी म्हणून त्यांना वाटते. पण या सर्व गोष्टींसाठी जे मार्ग वापरणे अपरिहार्य आहे असे ते स्वतःच नमूद करतात, ते मार्ग मात्र त्यांना अतिशय त्याज्य वाटतात. म्हणजेच असे, की ते चिनी शासनाचे मार्ग अपरिहार्य मानतात. पण त्या मार्गांच्या काही अनुषंगिक परिणामांना त्यांची तयारी नाही. या सर्व विवेचनासाठी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र यांचा आधार कानिटकर घेत नाहीत, किंबहुना याची सर्व चर्चा या शास्त्रात सातत्याने चालू असते याची दखलही ते घेत नाहीत.

अर्थात लेखकाने अमुक केले नाही अशी तक्रार करणे व्यर्थ आहे. त्याचप्रमाण एखाद्या वर्णनात्मक पुस्तकाच्या आधारावर लेखकाची, राजकीय मते तपासून पाहणेही योग्य नाही, मी सुरुवातीसच म्हटल्याप्रमाणे हे कानिटकरकृत 'चीनचे आख्यान' आहे आख्यानात वैचारिक परिपूर्णते पेक्षा श्रोत्यांच्या रंजनाकडे व उद्बोधनाकडेच जास्त लक्ष द्यावे लागते. हे कानिटकरांनी मोठ्या आत्मीयतेने परिश्रमपूर्वक आणि नेटाने केले आहे. त्याबद्दल त्यांना मराठी वाचक धन्यवाद देईल यात शंका नाही. मराठी माणसाची राजकीय जाणीव प्रगल्भ करण्याच्या तुरळक प्रयत्नांमध्ये कानिटकरांचे प्रयत्न विशेष मोलाचे व वैशिष्ट्यपूर्ण म्हणून नोंदले जातील याविषयी मला शंका नाही. ◻

**माओ क्रांतीचे चित्र आणि चरित्र :** रा. म. शास्त्री (श्री. वि. ग. कानिटकर)
इनामदार बंधू प्रकाशन, पुणे ३० : पृष्ठे ५०१ : मूल्य पंचवीस रुपये.



कोल्हापुरात तीन दिवस झालेले

# ग्रंथप्रदर्शन

**व. ह. पिटके**

**१९७२** हे आंतरराष्ट्रीय पुस्तक-वर्ष म्हणून मानण्यात येत आहे. या निमित्ताने ग्रंथांचा प्रसार कसा होईल, ग्रंथाचे लेखक, प्रकाशक, विक्रेते हे घटक अधिकाधिक जवळ कसे येतील व परस्परांच्या अडचणी समजवून घेऊन ग्रंथप्रसार वाढण्याचे उद्दिष्ट कसे साध्य होईल हा विचार ओघानेच येतो.

‘गुलमोहर’ बुक डेपोचे अरुण गाडगीळ हे मूळचेच एक उपक्रमशील, उत्साही ग्रंथप्रसारक, आता विक्रेते, कोल्हापूरसारख्या मध्यम वस्तीच्या शहरात ग्रंथप्रदर्शनाचे विविध कार्यक्रम ठेवून इथल्या ग्रंथप्रेमी मंडळीत त्यांनी या आधीच धमाल उडवून दिलेली आहे.

दि. ५, ६ व ७ फेब्रुवारी ह्या दिवशीही त्यांच्या परिश्रमाने आणि मौज प्रकाशन गृह मुंबई, चित्रशाळा प्रेस प्रकाशन पुणे व इंडिया बुक हाऊस पुणे शाखा ह्यांच्या सहकार्याने ग्रंथप्रदर्शन, विक्री आणि तीन परिसंवाद असे कार्यक्रम पार पडले. स्थळ होते, कॉलेज ऑफ कॉमर्स.

दि. ४ रोजी सायंकाळी कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य श्री. कोष्टी ह्यांच्या हस्ते सदर प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्रदर्शन आकर्षक रीतीने मांडण्यात गाडगीळ मुरलेले. ह्या तिन्ही प्रकाशकांची अगदी ताजी व काही दुर्मिळ पुस्तकेही इथे पाहायला आणि हाताळयाला मिळाली. (विकत न घेतली तरी.) आणि लहानापासून चष्मा लावून पहाणारांपर्यंत सर्वांनी तिन्ही दिवशी पुस्तकांभोवती रुंजी घालण्याचा कार्यक्रम ठेवला.

श्री. सखा कलाल ह्यांनी ह्याच अवधीत तीन परिसंवाद योजले.

दि. ५ रोजी ग्रंथ विक्रेत्यांचा परिसंवाद झाला.

या चर्चेचे संचालन रत्नाकर बुक डेपाचे श्री. दादासाहेब शहा यांनी केले.

वास्तविक या चर्चेत 'ग्रंथ-विक्रेत्यांपुढे असलेले प्रश्न सोडवणुकीसाठी सरकार काही प्रयत्न करीत आहे का ?' या सारखा किंवा 'सामान्य माणसाची अभिरुची सुधारण्यासाठी ग्रंथ विक्रेते काही प्रयत्न करीत आहेत ?' असे गैर लागू मुद्दे होते. ते अर्थात् फारसे चर्चिले गेले नाहीत. सामान्य माणसाच्या अभिरुचीबद्दल प्रा. ठक्कर यांनी काही विचार मांडले. ते फारसे प्रतिकूल नव्हते. ग्रंथ विक्रेते ग्रंथांची चांगल्या रीतीने मांडणी display करीत नाहीत, अशी तक्रार मांडण्यात आली. तिच्यावर अजब पुस्तकालयाचे मालकांनी जागेच्या व आर्थिक अडचणींचा पाढा वाचला. (वास्तविक ह्या अडचणींना तोंड देत असतानाच श्री. गाडगीळ हे पुस्तक प्रदर्शने व इतर उपक्रम करीत आले आहेत ना ?) इतर दुकानांतून कापड वगैरेच्या ग्राहकाला जसा चांगला अनुभव येतो, तसा पुस्तकांच्या दुकानातून येत नाही असा मुद्दा श्री. पिटके ह्यांनी मांडला. प्रा. शेठ ह्यांनी तर अनुभवांचा पाढाच वाचला. चर्चेचा समारोप करताना ग्राहकांची बाजूही विचारात घेतली जावी असे श्री. शहा यांनी सांगितले.

दि. ६ रोजी लेखक, पत्रकारांचा परिसंवाद होता. याचे संचालन प्रा. कमलाकर दीक्षित ह्यांनी केले. या परिसंवादात 'साहित्यिक व समाज' ह्यांच्या संबंधावर चर्चा झाली. श्री. पिटके ह्यांनी सुरुवात करतानाच एका वरच्या पातळीवर साहित्यिक व समाज ह्यांचे संबंध परस्परपूरकच असतात; काही तात्कालिक कारणांवरून त्यांच्यात मतभेद झाल्यासारखे वाटतात असे सांगितले. अश्लील वाङ्मय हीही समाजाची एक गरज असल्याचे श्री. प्रभाकर कुलकर्णी ह्यांनी म्हटले. तर लोकांना आवडते ते लिहायला हरकत नसल्याचे श्री. जयसिंग शिंदे ह्यांचे मत दिसले. उच्च प्रतीच्या वाङ्मयाचे स्वागत समाजाच्या थोड्या भागाकडूनच होणार असे प्रा. कमलाकर दीक्षित यांनी सांगितले. चर्चेत सुधाकर पवार, मधु भोसले, बाबा पाटील ह्यांनीही भाग घेतला. दि. ७ फेब्रुवारी रोजी कोल्हापुरातील ग्रंथपालांचा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. त्याचे संचालन शिवाजी विद्यापीठातील प्रा. अ. चिं. टिकेकर ह्यांनी केले. यावेळी ग्रंथ अधिक कसे वाचले जातील ह्यावर चर्चा झाली.

एकंदरीत ह्या तीन दिवसांत ग्रंथ-प्रसाराच्या अंगोपांगावर विविध बाजूंनी प्रकाशझोत टाकल्याने ह्या विषयाच्या सर्व बाजू कोल्हापूरच्या ग्रंथप्रेमी रसिकांना दिसल्या हे या प्रदर्शनाचे फलित थोडके नाही !

# इन्साफ! जल्लासाऽऽब इन्साऽऽफ!



पंजाबमधला
एक गाजलेला
खून खटला

अनुवाद
ॲडव्होकेट
माधव कानिटकर

लेखांक : चार

पंजाब हायकोर्टात धर्मवीरसिंगाचे अपील सुनावणीसाठी आले ते न्यायमूर्ती जी. डी. खोसला आणि न्यायमूर्ती कपूर यांच्या डिव्हिजन बेंचसमोर. धर्मवीरसिंगने आता वकील बदली केला होता. पंजाब हायकोर्टातच प्रॅक्टिस करणारे ॲड. जयगोपाल सेठी हे नामवंत वकील आता त्याच्या बचावासाठी उभे रहाणार होते. धर्मवीरसिंग त्यांना जेलमधे म्हणाला, ‘ पैशांची काळजी करू नका साहेब. पण माझ्या गळ्याभोवती लागलेली दोरी सोडवा. रात्रभर झोप लागत नाही.

‘ तू काळजी करू नकोस. मी आहे !

सुनावणीच्या पहिल्याच दिवशी त्यांनी एक जोरदार धडक मारली. त्यांनी कोर्टाला विनंती केली, 'मिलॉर्ड ! मला तारीख पाहिजे.'

न्यायमूर्ती नाराज झाले. ह्या उभयतांना तारीख मागितलेली आवडत नसे. न्यायाला विलंब म्हणजे अन्याय.

त्यांनी विचारलं 'कशासाठी ?'

'मिलार्ड ! पुराव्यात दाखल केली गेलेली दोन पुस्तकं, पावतीपुस्तक आणि रजिस्टर यांची मला काळजीपूर्वक पहाणी करायची आहे.', 'हे बघा, आम्ही न्यायमूर्ती बेदींचं जज्जमेंट नीट वाचलय, पुरावा वाचलाय, आमच्यामते त्या रजिस्टरला कवडीचीही किंमत नाही. ३० जानेवारी १९५७ ला डॉ. बुद्धदेव किंवा तुमचे अशील धर्मवीरसिंग यांना पोटॅशियम सायनाईड विकलं अशी नोंद त्या तारखेला नाही. आता राहिलं पावतीपुस्तक. ती तिथे पुरावा आहे. पण असा कितिसा वेळ लागणार आहे एक पावतीपुस्तक पहायला ? पंधरा मिनिटं ? अर्धा तास ? आताच बघा ते पुस्तक. आम्ही थांबतो !'

'आपले फार उपकार आहेत मिलॉर्ड !'

न्यायमूर्ती खोसलांचा हुकूम सुटला, 'डॉ. बुधवार आणि कंपनीचं पावतीपुस्तक वकीलसाहेबांना बघायला द्या.'

... एखादा बँकेचा कारकून नोटा देताना आणि घेताना जशा तीन-तीनदा मोजतो तितक्या काळजीपूर्वक ॲड. जयगोपाल सेठी यांनी पावत्या मोजल्या. नंबर पाहिले. आणि ताड्कन उभे रहात म्हणाले 'मिलॉऽऽर्ड ! या पुस्तकातल्या 'त्या' दोन पावत्या खोट्या आहेत. मला तारीख पाहिजे !'

आता सरकारी वकील ताडकन् उभे रहात म्हणाले 'मिलॉर्ड ! खालच्या कोर्टात असे ते कधीही बोललेले नाहीत.'

'खालच्या कोर्टात वकील मी नव्हतो. मला जर का हायकोर्टात एखादा बचावाचा चांगला मुद्दा सापडला, तर तसा पुरावा हायकोर्टापुढे आणण्याचा हक्क आहे. आणि हायकोर्टाला तसा अधिकार आहे.'

त्यांना हातांनी इशारा देत थंड करीत न्या. खोसला म्हणाले '...पण 'त्या' दोन पावत्या खोट्या आहेत... ?'

'पोलिसांनी घुसडून दिल्या आहेत.'

'...अहो जरा ऐका ! पण ते तुम्ही सिद्ध कसं करणार आहात ते आम्हाला सांगा ?'

'युवर लॉर्डशिप ! मी आत्ता अर्ज देतो. गोपाल पेपर मिलचे ॲसिस्टंट मिल सुपरिटेंडेंट श्री. विल्यम मार्शल हे कागद बनविण्याचे तज्ज्ञ आहेत. त्यांच्यावर समन्स काढा आणि साक्ष देण्यापूर्वी त्यांनाही या पावतीपुस्तकाचं इन्सपेक्शन घेण्याची परवानगी असावी ! तारीख मात्र उद्याची नको परवाची द्या मिलॉर्ड ! कारण

समन्स त्यांना 'लागायला' वेळ लागेल !"

न्यायमूर्ती खोसला आणि न्यायमूर्ती कपूर यांनी एकमेकांकडे पाहिलं. त्यांची आपसात हलक्या आवाजात चर्चा सुरू झाली. न्यायमूर्ती खोसला म्हणाले, 'मला वाटतं आपली हरकत नसावी. अॅड. जयगोपाल सेठींसारखा नामवंत वकील उगाच काहीतरी निमित्त करून तारीख मागणार नाही.' न्यायमूर्ती कपूर म्हणाले 'मी तुमच्याशी सहमत आहे.' ... आणि अखेर तारीख पडली.

त्यानंतर बरोब्बर तिसऱ्यादिवशी सकाळी ११ वा. सुनावणी पुढे सुरू झाली. विल्यम मार्शल हा जन्माने ब्रिटिश पण स्वतंत्र हिंदुस्थानातच रहाणारा, व नोकरी करणारा. गळ्याभोवतीची पांढरी पट्टी सोडली तर एरव्ही काळे कपडे परिधान करून उच्चासनावर बसलेल्या दोन न्यायाधीशांना अदबीने अभिवादन करून तो पिंजऱ्यात शिरला.

मार्शल यांनी साक्षीत सांगितलं, की 'श्री. गोपाल पेपर मिलमधे, अॅसिस्टंट मिल सुपरिटेंडंट, म्हणून भारी पगाराची नोकरी स्वीकारण्यापूर्वी १९ वर्षं इंग्लंडमध्ये पेपरमेकिंगचंच काम मी करीत होतो. कागद तयार करण्यासाठी जो कच्चा माल लागतो तिथपासून ते कागद तयार होईपर्यंतचं सर्व-ज्ञान मला आहे. माझ्याकडे तशी सर्टिफिकेटस आहेत. कोर्टापुढे आलेलं डॉ. बुधवार आणि कंपनीचं पावती-पुस्तक मी पाहिलेलं आहे. मी शपथपूर्वक सांगतो, की 'डॉ. बुद्धदेव यांना पोटॅशियम सायनाईड दिलं गल्याची पावती आणि त्यांनी जी औषधं विकत घेतली, त्याबद्दल दिलेली पावती ह्या दोन्ही पावत्या खोट्या आहेत. कशा ते सांगतो. कोर्टाची बे-अदबी होणार नसेल तर एक विनंती आहे. आपल्या खिशात काही पैसे असतील, तर एक दहाची नोट काढा.

'न्यायमूर्ती खोसला आणि न्यायमूर्ती कपूर दोघांनी दहा-दहाच्या नोटा खिशातून बाहेर काढल्या.'

...आणि स्वतःच्या खिशातून एक दहाची नोट काढून न्यायमूर्तींकडे देत साक्षीदार विल्यम मार्शल म्हणाले, आता या तिन्ही नोटा कशाही एकत्र करा आणि काही फरक आहे का बघा !'

'उभय न्यायमूर्ती म्हणाले, 'काही फरक नाही.'

"...या कोर्टाबद्दल मला संपूर्ण आदर आहे ! (With all the due respect towards the court !) पण मी सांगतो, की मी दिलेली नोट खोटी आहे. कशा-वरून ? आपल्या टेबलावरच्या दिव्यासमोर प्रत्येक नोट धरून पहा. नोट धराल त्या पद्धतीने पण उजवीकडे किंवा डावीकडे नोटांचा शेवट आणि मध्य यांच्या मधून वरून खाली गेलेली एक बाऽऽरिक काळी रेघ दिसेल. ती रेघ साधी नाही युवर लॉर्डशिपस् ! ती रेघ नव्हेच,? तो एक अतिसूक्ष्म धागा आहे. आणि खोट्या नोटा छापणारांना तो घालता येत नाही. फक्त नोटेसारखी दिसणारी नोट ते

छापू शकतात. ज्या नोटेमधे असा धागा दिसतो, ती खरी नोट ! रिझर्व बँक ऑफ इंडियाची ! दुसरी गोष्ट, आपल्या उजव्या हाताचा अंगठा आणि त्याच्या जवळचं बोट यांच्या चिमटीत धरून माझी खोटी नोट आणि तुमची खरी नोट आळीपाळीने पुढे मागे हलवून बघा. त्यांचा पोत बघा, रिझर्व बँकेची नोट हाताला जरा गुळगुळीत लागेल. कागद छान वापरतात. सहसा फाटणार नाही, पाण्यात बुडवल्यातर त्यांचा लगदा होणार नाही, वाळवली की चालते बाजारात. उलट माझ्या खोटया नोटेचा पोत तुम्हाला खरखरीत लागेल. ' न्यायमूर्तींनी दोन्ही प्रयोग करून पाहिले. साक्षीदार खरंच सांगत होता की ! ' म्हणून म्हणतो ' त्या ' पावत्या खोटया आहेत ! '

..." आता ते पावतीपुस्तक पहा युवर लॉर्डशिप ! ' त्या ' दोन पावत्यांचा अपारदर्शकपणा आणि त्याच पावतीपुस्तकातल्या बाकीच्या पावत्यांचा अपारदर्शकपणा दिव्याजवळ धरून पहा त्यात फरक आहे. त्यांचा पोत पहा, त्यात फरक आहे. एवढंच नव्हे युवर लॉर्डशिप, दिव्याजवळ धरून पाहिल्यावर दिसेल, की खोटया कॅश-मेमोवर आतून आडव्या रेघा दिसतील, तर खऱ्या मेमोवर उभ्या रेघा दिसतील. ' दोन्ही न्यायमूर्तींनी हाही प्रयोग पाहिला.

साक्षीदार शंभर टक्के खरं बोलत होता.

सरकारी वकिलांकडे पहात न्यायमूर्ती खोसला म्हणाले, ' यस ! एनी क्रॉस ?

सरकारी वकील मनात समजले होते, की एकूण काम कठीण आहे. पण पाहू या काही जमतं का !

ते उभे राहिले आणि उलटतपासणी सुरू झाली.

" मिस्टर विल्यम मार्शल ! तुम्ही कागदाचे तज्ज्ञ हे कबूल. "

" थँक्स ! "

".. पऽऽऽण ! पावती पुस्तकं कशी बनवताऽऽत, याचे काही तुम्ही तज्ज्ञ नाही ! "

" आहे तर ! कारखान्यातून कागदाचं रीम आलं, की ज्या आकाराचा कॅश मेमो बनवायचा त्या आकाराप्रमाणे तो मशीनवर कापला जातो, नंतर मूळ प्रत – त्याची नक्कल यांच्या क्रमाप्रमाणे ते लावले जातात. नंबरिंग डिपार्टमेंटकडे ते पाठवले जातात. नंतर पहिल्या दोन कागदांवर १ च नंबर, नंतर पुढच्या दोन कागदांवर २ अशा पद्धतीने नंबर मारले जातात. नंतर ते जातात प्रिंटिंग डिपार्टमेंटला. तिथे १–१, २–२ अशा पद्धतीने ते अर्धे अर्धे केले जातात आणि मग एका भागातले कागद १–२–३–४–५ या पद्धतीने एका खाली एक लावून, ऑर्डर देणाऱ्या कंपनीच्या इच्छेप्रमाणे मजकूर छापून नंतर ते बाइंडिंग डिपार्टमेंटला जातात, आणि तिथे १–१, २–२ अशा क्रमानं एकात एक पेपर मिसळून कॅश मेमो बाईंड होतो. "

" मिस्टर मार्शल ! असंही होत असेल नाहीं, की दोन वेगळ्या प्रकारच्या कागदाच्या रिमातून एकाच आकाराची कॅश-मेमो बुक्स एकाच वेळी तुम्ही बनवत असाल ?"

" शक्यता आहे !" (सरकारी वकिलांच्या जीवात जीव आला !)

" मग बघा ! मिस्टर मार्शल, एवढ्या सगळ्या भानगऽऽडीत कामगाराच्या चुकीमुळे, अगर कागदांची ने-आण करणाऱ्या शिपायाच्या चुकीमुळं म्हऽऽणा ! A ह्या प्रकारच्या कागदांपैकी कापलेले कागद...अगदी दोन-तीनच समजा गहाळ झाले तर त्यांची भरपाई करण्याकरता तो B ह्या प्रकारच्या कागदाचे त्याच आकाराचे कागद A मधे टाकत असेल !"

" तसं कसं होईल ? कागद मोजलेले असतात, पॅक केलेले असतात. आणि प्रत्येक डिपार्टमेंटचा सुपरवायजर पुढच्या डिपार्टमेंटला ते पॅकेट पाठवण्यापूर्वी काळजीपूर्वक बघतोच की, कागदांची क्वालिटी काय? ते किती आहेत आणि मगच ते बंद करून वर सही करून पुढे पाठवतो."

" आता कोर्टापुढे आलेला कॅश मेमो तुमच्याच कंपनीनं बनवला ?"

" नाही !"

" तो बाईंड केलेला नाही !"

" बाईंड केलेला होता !"

" मग कशावरून सांगता, की 'ते' दोन कॅश मेमो त्या पुस्तकात घुसडलेले आहेत ?"

" त्या पावती पुस्तकाचं बाइंडिंग (?) आता सुतळीचं आहे. आणि कॅश मेमोचं बाइंडींग सुतळीचं नसतं !"

...सरकारी वकील थकले, पण त्यांनी शेवटचा प्रश्न टाकलाच.

" हे बघाऽऽ ! माझं म्हणणं असं आहे, की 'त्या' दोन पावत्या खऱ्या आहेत. कॅश मेमो-बुक बनवत असताना कागदांची अदलाबदल होऊ शकते !

" हे खरं नाही."

" दॅटस ऑल युवर ऑनर !" म्हणत सरकारी वकील खाली बसले. न्याय-मूर्तींनी विल्यम मार्शलला सांगितलं, 'आपण जाऊ शकता !' कोर्टापुढे अदबीनें मान झुकवून विल्यम मार्शल निघून गेला !

न्यायमूर्ती खोसलांनी पुढे झुकत बचावाच्या वकिलांना विचारलं, 'एनी आर्ग्युमेंट'.

" नो युवर लॉर्डशिप्स !" (जरूरच नाही !) आता सरकारी वकिलांकडे पहात त्यांनी तोच प्रश्न विचारला, 'यस ? एनी आर्ग्युमेंट !"

" नो युवर लार्डशिपस !"

...आता कोर्टाची वेळ संपली होती. दुसऱ्या दिवशी रविवार होता ! न्यायमूर्ती

कपूर यांच्याकड पहात न्यायमूर्ती खोसला यांनी विचारलं, 'जजमेंट ?' 'बुधवारी ठेवाऽऽ."

"जजमेंट बुधवारी सकाळी ११ वा. !" असा हुकूम झाला. आणि उभय न्यायमूर्ती न्यायासनावरून उठून गेले.

सोमवारी सतत दोन तास. न्यायमूर्ती खोसला आपल्या चेंबरमध्ये न्यायमूर्ती कपूर यांच्याबरोबर धर्मवीरसिंगच्या भवितव्याची चर्चा करीत होते. दोघांनाही 'आतून' खात्री पटली होती की, 'मोहिंदरसिंगचा खून धर्मवीरसिंगनेच केला!

तरीपण न्यायमूर्ती खोसलानी, न्यायमूर्ती कपूर यांना विचारल, "तुमचं काय मत आहे ?"

न्यायमूर्ती कपूरनी मत दिलं, "लटकवावा! फाशी कायम करावी!" न्यायमूर्ती खोसला गंभीर बनले. बऱ्याच वेळाने न्यायमूर्ती कपूर यांच्याकडे पहात ते म्हणाले, 'माझं मत आहे, संशयाचा फायदा देऊन त्याला सोडून द्यावा!"

झालं! हायकोर्टाच्या दोन नामवंत जज्जांच्या मतात इतक अंतर पडलं! आता मार्ग? अपील तिसऱ्या जज्जजवळ सोपवावं.. पण तेवढ्यात चीफ जस्टिस न्यायमूर्ती खोसला म्हणाले, "आपण असं करू, आपण आपली दोघांची वेग-वेगळ्या मतांची जजमेंटस् स्वतःच्या हातानं लिहून काढू. कारण एकदा का मनुष्य लिहायला बसला म्हणजे त्याची काय असेल ती बुद्धिमत्ता, तर्क, सुसंगती, सगळं सगळं कागदावर उतरतं! आपण आपापली जजमेंटस बदली करून वाचू. जर का माझं मत तुम्हाला पटलं तर तुम्ही माझ्या जजमेंटवर सही करा! आणि तुमचं मत मला पटलं – थोडंसं जरी पटलं तर तुमच्या जजमेंटवर मी सही करीन!

...उभय न्यायमूर्तींनी काळजीपूर्वक आपापली वेगळी-वेगळी जजमेंटस लिहून काढली.

आता न्यायमूर्ती कपूर न्यायमूर्ती खोसलाचं जजमेंट वाचत होते! न्यायमूर्ती खोसलांचं थोडक्यात म्हणणं असं होतं, की 'मोहिंदरसिंग पोटॅशियम सायनाईड मुळेच मेला याला संशयातीत पुरावा आहे. आरोपी धर्मवीरसिंग मोहिंदरसिंग मरायच्या ५–१० मिनिटं अगोदरच नव्हे, तर दुपारी सिनेमाला गेल्यापासून त्याच्या सहवासात होता. आरोपी धर्मवीरसिंगला विष देण्याची संधी मिळाली हाही पुरावा संशयातीत आहे, पण...पण...पण...! पोलिसांची या खटल्यातली वागणूक उपेक्षा करण्यासारखीच आहे. मुख्य शेवटचा मुद्दा हा होता, की धर्मवीरसिंगनेच विष मिळवलं आणि त्यानीच मोहिंदरसिंगला ते दिलं. विल्यम मार्शलची साक्ष स्पष्ट दाखवते, की 'डॉ. बुधवार आणि कं. ने डॉ. बुद्धदेव यांना दिलेल्या 'त्या' दोन पावत्या खोट्या आहेत. आणि इथे खटल्याचा पायाच उखडला गेलेला आहे. धर्मवीरसिंगनी विष मिळवलंच नाही–तसा पुरावा नाही–तर तो देईल कुठून? पोलिसांची केस संशयास्पद आहे. पोलिसांचा एकूण कल आरोपीला काहीही करून

लटकवायचाच असा होता असं या खोटया पावत्या घुसडण्याच्या शहाणपणावरून दिसतं. आरोपीला संशयाचा फायदा मिळाला पाहिजे. सबब मी त्याची सुटका करतो ! (Acquitted)

...आता न्यायमूर्ती खोसला न्यायमूर्ती कपूर यांचं जजमेंट वाचत होते ! विष-प्रयोग सिद्ध करून देण्यासाठी सरकारपक्षाला जे तीन मुद्दे संशयातीतरीत्या सिद्ध करून द्यावे लागतात त्यांपैकी पहिल्या दोन मुद्यांशी उभय न्यायमूर्ती सहमत होतेच. आता उरला फक्त तिसरा मुद्या धर्मवीरसिंगनी विष मिळवलं ? त्यानंच ते मोहिंदरसिंगला पाजलं ?

या बाबतीत न्या. कपूर म्हणत होते, 'धरून चालू त्या पावत्या खोटया आहेत ! तरीदेखील भारताच्या पुरावा विषयक कायद्यात (Evidence Act) परिस्थितिजन्य पुरावा म्हणून काही आहे की नाही ? (Circumstantial Evidenee). आरोपी धर्मवीरसिंगने मोहिंदरसिंगचा पावणे दोन लाखाचा विमा उतरवणं, स्वतःचं नॉमिनी होणं. ही गोष्ट कुणालाही ठाऊक नसणं ! मोहिंदरसिंग पंजाब हॉटेलमधे अचानक मरतो, त्यावेळी रामकिशन आणि आरोपी धर्मवीरसिंग तिथे होते. लगेच धर्मवीरसिंग पैशांसाठी मागणी करतो ! रामकिशन आणि धर्मवीरसिंग प्रथम डॉ. बुद्धदेव यांच्याकडे आणि नंतर डॉ. बुधवार आणि कं. मधे एकमेकांबरोबर गेले होते असं ते सांगतात, काय दाखवतो हा पुरावा ? धर्मवीरसिंग दोषी आहे !

न्यायमूर्ती कपूर आपल्या सुंदर इंग्रजीत म्हणतात,

" Mr. Justice Khosla ! Read this evidence to a prudent, right thinking man in the street ! And watch his reaction ! According to the Evidence Act, a fact must be taken as proved if, on hearing the entire evidence in support of it, a prudent man would act as if the fact existed !

न्यायमूर्ती कपूर यांचा मुद्दा थोडक्यात असा होता, की 'मोठ मोठी बुद्धिमान माणसं—अगदी एम. ए. विथ मराठी ! एम. ए. ला फर्स्ट क्लास फर्स्ट ! ज्ञानेश्वरी आणि तुकारामाची गाथा वाचतात त्यात विशेष ते काय ? त्याना डिग्री हवी असते ! पण सामान्य माणसदेखील ते दोन ग्रंथ श्रद्धेने वाचतात. का ? कारण ते ग्रंथच चांगले आहेत ! याच तत्त्वाची कास धरून सांगतो, की 'आरोपी दोषी आहे !'

...न्यायमूर्ती खोसलांनी खिडकीतून बाहेर पाहिल, त्यांना असह्य मनःस्ताप झाला. न्यायमूर्ती कपूर चुकत नव्हते. खोसलांचा आतला आवाज त्यांना तेच सांगत होता. 'माझ्यामुळे एक खुनी बदमाश निर्दोष सुटला असं व्हायला नको !' (I was anxious to prevent a miscarriage of Justice by wrongly acquitting

a guilty man) त्यांनी स्वत:चं जजमेंट फाडून टाकलं आणि न्यायमूर्ती कपूर यांच्याशी ते सहमत झाले.

...बुधवार सकाळ उजाडली. सकाळी ९-९॥ पासूनच पोलीस, वर्तमानपत्रांचे वार्ताहर, आणि लोकांची टोळकी पंजाब हायकोर्टात घुसू लागली. बंदोबस्ताच्या पोलिसांच्या नाकी नऊ आले !

...बरोब्बर ११ वा. न्यायमूर्ती खोसला आणि न्यायमूर्ती कपूर न्यायासनावर येऊन बसले. जजमेंट तयार होतंच. कोर्टात पिनड्रॉप सायलेन्स होता.

...धर्मवीरसिंगला उभा केला गेला ! अॅड. जयगोपाल सेठी स्वत:च उभे राहिले. न्यायमूर्ती खोसलांनी शिरस्तेदाराला हळूऽच सांगितलं 'त्याला सांगा फाशी कायम झाली' शिरस्तेदाराने धर्मवीरसिंगला मोठ्या आवाजात सांगितलं' 'एऽऽ! ये देखो तुम्हारी फासी की सजा (सजा ए मौत !) कायम की गई है !'

कोर्टात हलकल्लोळ माजला, लोकांनी टाळ्या वाजवल्या. कुणी नाचायला लागले. बंदोबस्ताच्या ऑफिसर्सनी हातांतले दडुके दाखवीत आणि हातांनी ढकलीत लोकांना कोर्टाच्या बाहेर काढले. लोकांनी खाली जाऊन फटाके लावले. न्यायमूर्ती कपूरनी न्यायमूर्ती खोसलांकडे सूचक अर्थाने पाहिले.

...इकडे धर्मवीरसिंगची अवस्था फार वाईट झाली होती. त्याचे हातपाय थरथरत होते. सर्वांगाला घाम फुटला होता. कडक पोलीस बंदोबस्तात पोलीस व्हॅनकडे जाता जाता त्याने घाबरलेल्या अवस्थेत आपोआप येणाऱ्या घोगऱ्या आवाजात विचारलं 'वकीलसाहेब ! आता काय करायचं ?'

...आणि त्याच्याकडे पहात अॅड. जयगोपाल सेठी म्हणाले 'घाबरू नको ! आता सुप्रीम कोर्ट !'

सुप्रीम कोर्ट ! स्वतंत्र सार्वभौम भारताचे सर्वोच्च न्यायालय. तिथली एकूण सजावट आणि वातावरण (Decorum) सर्वोच्च न्यायालय या शब्दाला शोभेल असंच होतं.

सुरुवातीला सुप्रीम कोर्टात अपील दाखल होऊच शकत नव्हतं, कारण सुप्रीम कोर्टात अपील करण्याची परवानगी पंजाब हायकोर्टाने दिली नव्हती ! पण या देशाची घटना आहे ना ! Indian Constitution प्रमाणे हायकोर्टाने परवानगी नाकारली तरी सुप्रीम कोर्ट तो नकार ठोकरून देऊन अपील अॅडमिट करून घेऊ शकतं. भारताच्या प्रत्येक नागरिकाच्या कायदेशीर हक्काची जपणूक करणं हे सर्वोच्च न्यायालयाचे पवित्र कर्तव्य आहे ! अॅड. जयगोपाल सेठी यांनी प्रथम हे काम केलं. आपल्या अमोघ आणि अजोड वक्तृत्व शक्तीने त्यांनी सुप्रीम कोर्ट 'हलवून' टाकलं ! (He moved the Supreme Court for Special

Leave ! )...आणि अखेर धर्मवीरसिंगचं अपील सर्वोच्च न्यायालयात अॅडमिट झालं ! आज त्या अपीलाची सुणावणी होती !

सकाळी १० वाजल्यापासूनच धर्मवीरसिंगचे नातेवाईक, वार्ताहर, बडेबडे वकील, या केसमध्ये उत्सुकता असलेले लोक, पंजाब पोलीसचे वरिष्ठ अधिकारी, सुप्रीम कोर्टात आपापल्या राखीव जागेत गुपचुप येऊन बसले होते. सगळ्यांच्या नजरा खिळल्या होत्या त्या अॅड. जयगोपाल सेठीवर ! त्यांच्या डाव्या-उजव्या हाताला त्यांचे ज्युनियर्स बसले होते. त्यांच्यासमोर कायद्याच्या पुस्तकांचा ढीग पडला होता ! आता ११ वाजत आले होते. आपल्याकडे शिकायला असलेल्या त्या वकिलांना (ज्युनियर्सना !) उद्देशून अॅड. जयगोपाल सेठी म्हणाले, लक्षात आहे ना ? मीं एकदा का बोलायला उभा राहिलो की मला जऽऽरा देखोल डिस्टर्ब चालत नाही. डॉक्टर ऑपरेशन करताना बोलत नसतो ! नुसतं पहिलं हत्यार खाली ठेवून हात पुढे करतो. हुशार आणि तत्पर नर्स डॉक्टरना कुठलं हत्यार पाहिजे ते समजते आणि त्यांच्या हातात ठेवते ! ते काम तुम्हाला आज करायचंय. मी बोलताना 'अमूक सालच्या, अमूक कायद्याच्या, अमूक भागाच्या (Volume), अमूक पानावर असं असं म्हटलय !' असं म्हणायची खोटी त्या. सालचा, तो कायदा, तो भाग आणि ते पान काढून पुस्तक माझ्या हातात ठेवा ! मग माझं आर्ग्युमेंट चालू !"

...न्यायासनावर ५ सुशोभित आसनं मध्ये थोडं थोडं अंतर सोडून गोलाकार मांडलेली होती. फुल बेंच ! धर्मवीरसिंगाचं भवितव्य आता सर्वोच्च न्यायालयाचे ५ न्यायमूर्ती ठरवणार होते. ११ ला २ मिनिटं कमी असताना प्रत्येक आसना मागे दरबारी थाटाचा पोषाख केलेले ५ पट्टेवाले येऊन उभे राहिले. हा काय प्रकार आहे ? पण प्रत्यक्ष पहाच आता ! बरोबर ११ वाजता आणखी एका ६ व्या शिपायाचा आवाज झाला, "सायलेऽऽऽन्स !" वकील, पोलीस अधिकारी, वार्ताहर, इतर लोक, कमीतकमी आवाज होईल अशा दक्षतेने उभे राहिले ! कायद्याच्या क्षेत्रातले ५ प्रकांड पंडीत आपापले काळे झगे फडकवीत एका मागोमाग एक धीर-गंभीर चेहऱ्याने न्यायासनाच्या पायऱ्या चढत होते ! न्यायासनावर उभ्या असलेल्या 'त्या' पाच पट्टेवाल्यांनी ती ५ सुशोभित न्यायासने थोऽऽडी मागे सरकवली ! (सुप्रीम कोर्टात खटला ऐकायला आलेल्या एका अतीव सुंदर स्त्रीने नेहमीप्रमाणे तिच्या नवऱ्याला मूर्खासारखं विचारलं, "हे काय ! खुर्च्या (!) मागे कशाला घेतायत ! पडतील ना जज्ज !) पाचही न्यायमूर्तींनी मागे न बघता आपापल्या जागा घेतल्या. क्षणात न्यायासनं पट्टेवाल्यांनी परत थोऽऽडी पुढे सरकवली ! आणि कोर्टात उपस्थित असलेल्या सर्व व्यक्तींच अभिवादन स्वीकारीत ५ न्याय-मूर्ती सुखरूप आपापल्या आसनावर बसले !

...आता उभे होते ते फक्त अॅड. जयगोपाल सेठी. न्यायमूर्तींना पुन्हा एकदा अभिवादन करून ते काही बोलणाऽऽर तोच उच्चासनावर मध्यभागी बसलेल्या

चीफ जस्टिस, सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया यांनी त्याना हुकूम दिला,

" जरा थांबा ! मी सुरुवातीलाच तुमचं एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधू इच्छितो. या खटल्यात सेशन्स जज्ज, न्यायमूर्ती बेंदी यानी दिलेलं (Judgement); अपीलातील पंजाब हायकोर्टाचे न्यायमूर्ती खोसला आणि न्यायमूर्ती कपूर यांचे निकालपत्र आणि पुराव्याचे कागदपत्र आम्ही नीऽऽट वाचलेत. डॉ. बुधवार आणि कं. चे सेल्समन संतसिंग यांनी डॉ. बुद्धदेव यांना त्यानी औषधासाठी आणि पोटॅशियम सायनाईडच्या खरेदीसाठी दिलेल्या 'त्या' दोन पावत्या (Cash Memos!) पंजाब हायकोर्टाने खोटया ठरविल्या. पावत्या खऱ्या असणं किंवा खोटया असणं ही फॅक्ट (हकीकत) आहे—तो कायदा नव्हे!—आणि तुम्हाला ठाऊक आहे, की कुठल्याही फॅक्टवर एकदा का हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचनं मत दिलं. की सुप्रीम कोर्ट त्याच्यावर पुन्हा विचार करीत नसतं! आता उरला फक्त परिस्थितिजन्यपुरावा! (Circumstantial Evidence) तेव्हा पावत्यांचा उल्लेख न करता फक्त परिस्थितिजन्य पुराव्यावरच बोला!"

अॅड. जयगोपाल सेठी डगमगले नाहीत! त्यांनी बोलायला सुरुवात केली. " मिलॉर्ड! सुरुवातीलाच सांगतो, की या न्यायालयाविषयी मला अंत:करणापासून आदर आहे! न्यायमूर्ती आणि वकील यांच्यात कायद्याच्या क्षेत्रात मतभेद झाला—बौद्धिक विसंवाद झाला—तर तो बोलून दाखवायला नवीन वकील घाबरतो! पण मी घाबरत नाही तो यासाठी, की भांडण आणि बौद्धिक विसंवाद यातला फरक भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नक्कीच समजतात! कधी कधी असं होतं, की दोन माणसांत भांडण—मतभेद—बौद्धिक विसंवाद असतो. आणि दोघांचही बरोबर असतं! कारण दोघंही एकाच सत्याचा वेगवेगळया दृष्टिकोनातून पाठलाग करीत असतात. एखाद्या फॅक्टवर हायकोर्टाच्या डिव्हिजनबेंचने मत दिलं की सुप्रीम कोर्ट त्यावर पुन्हा विचार करीत नसतं हे मला मान्य आहे मिलॉर्ड! पण आता माझ्या दृष्टिकोनातून चक्र थोऽऽडं उलट फिरवू. (Let us take other way round!) 'त्या' दोन पावत्या खऱ्या आहेत की खोटया आहेत ही फॅक्ट आहे. पण...पण फॅक्ट जर अॅक्टमध्ये (कायद्यात) अशा रीतीनं घुसली असेल, (Entangaled) की फॅक्टचा विचार झाला नाही तर अॅक्टच नामशेष होईल तर सुप्रीम कोर्टाला फॅक्टवर पण विचार करावा लागेल! तशी परिस्थिती या खटल्यात आहे. पावत्या खोटया ठरल्यामुळे खटल्याचा पायाच उखडला गेलाय. दुसरा मुद्दा, परिस्थितिजन्य पुराव्यातली प्रत्येक घटना ही देखील एक-एक फॅक्ट आहे! त्याच्यावर हायकोर्टानं मत दिलंय! त्याच्यावरच फक्त सुप्रीम कोर्ट विचार करणार असेल तर तो अन्याय आहे! मग कशाला केलं मी अपील? माझ्या अशीलाला हायकोर्टाचा निकाल झाल्याबरोबरच मी सांगितलं असतं, की 'आता वरती कोर्ट नाही बाबाऽऽ!' पावत्या खोटया होत्या! असं पंजाब हायकोर्ट म्हणतं—मी एकटा नव्हे. मग खोटया

पावत्या देणाऱ्या डॉ. बुधवार आणि कं. चा सेल्समन संतसिंग याच्या तोंडी साक्षी-वर कितपत विश्वास ठेवायचा ? त्याच कंपनीचा कस्टमर असलेला डॉ. बुद्धदेव–की जो नेहमीच या कंपनीकडून चिठ्ठ्या घेऊन विष खरेदी करायचा, त्याच्या तोंडी साक्षीवर कितपत विश्वास ठेवायचा ? ज्या बाटलीमधून ते पोटॅशियम सायनाईड डॉ. बुद्धदेवनं घेतलं ती बाटली धर्मवीरसिंगकडे मिळालेली नाही ! तसा पुरावा नाही ! घेतलंच नाही तर मिळणार कुठून ! आणि मोहिंदरसिंगला ते देणार कुठून ! पोलिसांचं कामच चुकीचं आहे. पावत्या खोट्या ठरल्यामुळे सगळा तथा-कथित (So called !) परिस्थितिजन्य पुरावाच संशयास्पद ठरतो. मिलॉर्ड ! फक्त याच मुद्दावर विचार व्हावा आणि आरोपीची निर्दोषी म्हणून मुक्तता व्हावी अशी माझी नम्र विनंती आहे. ”

...अॅड. जयगोपाल सेठी खाली बसले. सर्वोच्च न्यायालयाचे चीफ जस्टिस अॅड. जयगोपाल सेठींकडे पहात म्हणाले, “ आम्ही विचार करतो ! जरा बसा ! पाचही न्यायमूर्ती चीफ जस्टिसच्या चेंबरमध्ये शिरले. शिपायांची धावपळ झाली ! तिथे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या ५ न्यायमूर्तींनी कायद्याच्या ज्ञानाचा आणि भारतीय नागरिकांच्या हक्कांच्या संरक्षणाच्या विचारांचं आदान-प्रदान केलं. आणि अहो आश्चर्यम ! धर्मवीरसिंगच्या बायकोचं कुंकू बळकट ! चुडा तिचा सावित्रीचा! सुप्रीम कोर्टाच्या पाचही न्यायमूर्तींचं एक मत झालं, की ९ गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एकही बेगुन्हा मनुष्य फाशी जाता कामा नये ! धर्मवीरसिंगनंच ते विष मिळवलं ! त्यानंच ते मोहिंदरसिंगला दिलं हे सिद्ध होत नाही. तो मुद्दा संशयास्पद आहे; आणि संशयाचा फायदा आरोपीला दिला पाहिजे. तसा कायदा आहे आणि प्रत्येक भारतीय नागरिकाला कायद्याप्रमाणे न्याय दिला पाहिजे !

.. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश पुन्हा एकदा आपापल्या असनां-वर इतमामाने येऊन बसले. अॅड. जयगोपाल सेठी उभे राहिले. आणि चीफ जस्टिसनी हुकूम दिला,

“ संशयाचा फायदा देऊन आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे ! ”

...एवढ्यावर भागलं नाही. सुप्रीम कोर्टाने पंजाब पोलिसांवर कडक ताशेरे झाडले– “ There could be no doubt at all that, that is precisely what a police officer had done in the excess of zeal. He had been unable to trace the source of the poison and had fabricated this piece of evidence ! ”

...पंजाबमध्ये एकच खळबळ माजली ! संध्याकाळची वृत्तपत्रं तडाखेबंद संपली कुण्या संपादकाचं हेडिंग होतं.

“ धर्मवीरसिंग निर्दोषी ! सर्वोच्च न्यायालयाचे पंजाब पोलिसांवर ताशेरे ! ” त्याच वृत्तपत्रांची इंग्रजी आवृत्ती म्हणत होती, “ DHARMAVIRSING

ACQUITTED ! STRICTURES ON PUNJAB POLICE !"

...आपण 'सुटलो' हे धर्मवीरसिंगला कळलं तेव्हा कसा झाला त्याचा चेहरा? एकच प्याला नाटकात सिंधूने "खरंच नाऽथ ! खरंच ! खरंच तुम्ही उद्यापासून दारू सोडलीत?" हे वाक्य बोलताना नटीच्या चेहऱ्यावर जो भावपूर्ण गोंधळ आणि हृदयस्पर्शी संमिश्र भावनांचं दर्शन घडतं तशी त्याची अवस्था झाली ! त्या अवस्थेतून तो भानावर आला. आणि त्याने अॅड. जयगोपाल सेठींना अक्षरश: मिठी मारली !

"वकीलसाहेऽऽब ! कमाल आहे तुमची ! तुमची सगळी फी माझ्या नातेवाईकांनी दिली. पण तेवढ्यावर माझं समाधान नाही ! तुम्ही पुरे म्हणेपर्यंत आणखीन नोटा तुमच्या पायाशी बसून मोजीन ! जमीनदार आहे मी !"

...वारं प्यालेल्या वासरासारखा धर्मवीरसिंग यमुनानगरमधे शिरला. एकेकाळी त्याचा आदर करणाऱ्या मोठमोठ्या जमिनदारांनी त्याला टाळला. एकेकाळी त्याच्याकडे कर्ज मागायला आलेले लोक त्याला बघून रस्त्यात थुंकले ! धर्मवीरसिंग थबकला आणि हबकला ! त्याच्या लक्षात आलं, की 'सुप्रीम कोर्टानं काहीही निकाल दिला असला, तरी जनता माझ्यामागे नाही !'

विमनस्क स्थितीत तो घरी आला ! त्याच्या आईने त्यांच्या तोंडावरून हात फिरवला ! "आलास राज्याऽऽ ! आधी देवाच्या पाया पड. देवाची कृपा ! वाऽहे गुरूची कृपा ! ग्रंथ साहेबाची कृपा !" धर्मवीरसिंग कसा बसा देवाच्या पाया पडला. साश्रू नयनांनी त्याच्याकडे पहाणाऱ्या त्याच्या पत्नीकडे पाहायची त्याला शरम वाटली ! आपल्या खास खोलीत शिरत त्याने हुकूम दिला. "बिशनसिंग ! सोडा आण ! आणि कुणी आलंच तर मी घरात नाही म्हणून सांग !"


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**वि. स. वाळिंबे**

मूल्य : रुपये अठरा

राजहंस प्रकाशन, पुणे

धर्मवीरसिंग दारू प्यायला बसला ! एकवेळ फाशी परवडली. पण ज्या गावात आपण जन्माला आलो, लहानाचे मोठे झालो ! मान मिळवला. तो आपल्या हातानी आपण घालवला ! ह्यासारखी मोठी शिक्षा नाही माणसाला ! हे विसरलं पाहिजे...विसरलं पाहिजे !

... आपल्याला न्याय मिळेल या आशेने सुप्रीम कोर्टाच्या इमारतीच्या घुमटाभोवती घुटमळणारा मोहिंदरसिंगचा आत्मा आता मुक्त होऊन वर जात होता. जाताजाता त्याने दोन अदृष्य अश्रू न्यायदेवतेच्या पुतळ्यावर टाकले "न्यायदेवते ! तुझं काही चुकलं नाही ! तू कायद्याप्रमाणे न्याय दिलास. चुकलो मी ! जिवंतपणी मी दारू पीत नसतो तर असा धोका खाऊन मेलो नसतो. जातो मी !"

... त्याच्या वर वर जाणाऱ्या 'अंगुष्ठमात्र प्रमाणं' आत्म्याकडे पहात दारू प्यायलेल्या धर्मवीरसिंगने हात जोडले. "मोहिंदरसिंग ! माफ कर मला ! सुप्रीम कोर्टानं काहीही निकाल दिला असला तरी मी तुला मारला ... मी ! फाशी पेक्षा जास्त मोठी शिक्षा मिळाली मला." .. आणि कोपऱ्यात जाऊन एखाद्या लहानमुलासारखा रडू लागला.

... तिकडे पोलीस खात्यात वेगळीच खळबळ माजली. पेपर वाचून I. G. P. (Inspector General of Police, State of Punjab) चिडला ! ते लोण खालपर्यंत येऊन पोचलं. कमिशनर ऑफ पोलीस, अंबाला यानी डेप्युटी पोलीस कमिशनरला हुकूम दिला "त्या नालायक सब-इन्स्पेक्टर जसवंतसिंगची कॉन्फिडेन्शियल फाईल माझ्याकडे पाठवा आणि त्याला मला ताबडतोब भेटायला सांगा !'

मृत मोहिंदरसिंगने सुरुवातीला तळतळाटाने दिलेला शाप अक्षरश: खरा ठरला. प्रथमच धर्मवीरसिंगला अटक झाली असती, तर चौकशी नीट झाली असती ! D. C. P. चा हुकूम थ्रू प्रॉपर चॅनल खालीखाली येत S. I. जसवंतसिंगना पोचला. !... आणि हेचि काय फल मम तपाला ? अशा अर्थाचा विचार करीत अस्वस्थ झालेले सब-इन्सपेक्टर जसवंतसिंग जीप मध्ये जाऊन बसले. प्रत्येक माणसाची भवितव्यता ज्या दिशेने पुढे धावत असते ती दिशा माणसाला ठाऊक नसते. तिचा वेग जाणवतो तो आयुष्यात फटका खाल्ल्यानंतर! त्याच वेगाने यमुनानगर पोलीस स्टेशनची जीप अंबाल्याच्या दिशेने सुसाट धावत सुटली !...

# स मा प्त

१८ मार्च १९७२

त्यांनी माया किती जमवली हे सांगता येणार नाही. पण एक अल्पशिक्षित, गरीब, काळासावळा, अनाकर्षक पर्सनॅलिटीचा, दुर्बळ प्रकृतीचा माणूस गुंतागुंतीच्या ग्रंथव्यवसायात मित्रप्रेमाचं उदंड भांडवल उभारू शकतो हे त्यांनी दाखवून दिलं !



# माझे मित्र कै. बाबूराव इनामदार

**म. श्री. दीक्षित**

मंगळवार हा माझा सुट्टीचा वार असल्याने, या दिवशी सकाळचे नाट्यसंगीत ऐकून, मी नित्याप्रमाणे बाबूराव इनामदारांकडे गेलो. देवदर्शनाला जावं त्याप्रमाणे गेल्या कित्येक वर्षांचा माझा हा नेम आहे. पण या दिवशी (२२ फेब्रुवारी) बाबूरावांची अंगणालगतची खिडकी बंद होती. ही खिडकी बंद दिसली, की खुशाल समजावं–बाबूराव एकतर आजारी असणार किंवा मुंबईला धंद्यानिमित्त गेले असणार. माझा अंदाज खरा ठरला होता. चौकशीसाठी मी आतल्या खोलीत डोकावलो तो समोरच्या कॉटवर बाबूराव आजारी अवस्थेत बसून होते. शेजारी त्यांची पत्नी देवपूजा करण्यात गर्क होती. मला पाहताच 'या-या' असं म्हणून बाबूरावांनी मला शेजारीच बसवून घेतलं. आदल्याच दिवशी ब्लडप्रेशरचा अ‍ॅटॅक आल्याचं त्यांनी मला सांगितलं व आता आज बरं वाटतंय असंही ते आत्मविश्वासाने म्हणाले. इकडल्यातिकडल्या कौटुंबिक गप्पा झाल्यावर मी उठू लागलो तशी बाबूरावांनी मुलाला सांगून दोन सिगरेटस् मागवल्या व 'चहा घेता का ? आत्ता होईल.' अशी नित्याची आर्जवी गळ घातली. चहा करणं तापदायक. म्हणून मी फक्त सिगरेटचा आस्वाद घेऊन बाबूरावांचा निरोप घेतला. त्यांची माझी सलगीची ही अखेरची भेट ठरेल असं मला स्वप्नातदेखील वाटलं नाही.

त्यानंतर रविवार दि. २७ फेब्रुवारीला सायकाळी भीमराव कुलकर्णी यांनी 'बाबूरावांना जहांगिर नर्सिंग होममध्ये पोचवल्याची' धक्कादायक वार्ता सांगितली. ती ऐकून मी बेचैन झालो. भीमराव 'चला' म्हणताच त्यांच्या स्कूटरवरून आम्ही बाबूरावांच्या भेटीला लगोलग गेलो. बाबूरावांची तिथली रुग्णावस्था पाहून मला फार क्लेश होत होते. मला पाहून ते एवढंच बोलले, 'चष्मा चांगला दिसतो

तुम्हाला.' मी 'असं?' एवढंच बोललो आणि 'स्वस्थ पडून रहा' एवढं सांगून बाहेर व्हरांड्यात आलो. हॉस्पिटलमधील पेशंटजवळ बोलत बसणं मला सोसवत नसल्याने मी सहसा अशा पेशंटस्च्या भेटी टाळतो. पण या पेशंटची भेट टाळणं मला शक्य नव्हतं. त्यानंतरच्या गेल्या मंगळवारी बाबूरावांच्या घरी जाऊन मी चौकशी केली. 'बरं वाटतंय्, लवकरच घरी येतील' असा दिलासा नोकराने मला दिला. त्यामुळे मी निश्चिंत होतो.

पण गुरुवार दि. २ मार्चला, दुपारी माझे मित्र र. गं. विद्वांस अचानक घरी आले तेच मुळी बाबूराव गेल्याची दुःखद वार्ता सांगत. क्षण, दोन क्षण दुःखद मनःस्थितीत बसलो नि मिळेल तो हार घेऊन विद्वांसांसमवेत बाबूरावांच्या घरी गेलो. अंगणात मित्रमंडळी गोळा होत होती. ज्या घरात मी नेहमी उत्साहाने, आनंदाने जात होतो, बाबूरावांसह बायकामुलांशी गप्पागोष्टी करत होतो, त्या घरात प्रवेश करणं माझ्या अगदी जिवावर आलं. मी मुळी आत गेलोच नाही. जिथे बाबूरावांचा शब्द ऐकू येणार नाही, स्नेहाळ आदरातिथ्य होणे नाही, किंबहुना जिथे आता बाबूरावच सजीवपणे अस्तित्वात नाहीत, तिथे-त्या घरात जायचं तरी कशाला आणि तिथल्या शोकात, आकान्तात बुडायचं तरी कशाला? मन घट्ट करीत होतो, पण पाऊल आत उचलत नव्हतं.

प्रकाशकमित्र बाबूराव इनामदार यांचा माझा परिचय पंचवीस वर्षांपासूनचा तरी होता. टिळक रोडवर 'वाङ्मयशोभे'च्या कार्यालयात ते नोकरीला होते— अगदी तेव्हापासून. हा परिचय उत्तरोत्तर वाढत गेला. राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक पातळीतील काही समान गोष्टींमुळे या परिचयाचे मैत्रीत केव्हाच रूपांतर झाले. 'सावरकर' हे आमचं समान गोत्र होतं, हिंदुत्वाभिमान हा आमचा समान धर्म होता. मनोहरपंत केळकरांकडे नोकरीस असताना बाबुरावांना छपाई, कागद, जाहिरात वितरण, पुस्तकविक्री इत्यादी गोष्टींची चांगली ओळख झाली होती. त्यांचं शिक्षण चारसहा यत्ता झालेलं. पण प्रामाणिकपणा, कष्ट, सौजन्य, कुणाला न दुखवता, किंबहुना स्वतःकडे कमीपणा वा माघार घेऊन काम करण्याची हातोटी इत्यादी सात्त्विक गुण त्यांचे ठायी भरपूर होते. बाबुरावांचं घर आईवडील, भाऊ-वहिणी इत्यादींनी भरलेलं आणि गुण्यागोविंदाने नांदणारं असं आहे. आर्थिक समृद्धी नसूनही या इनामदार घरातील भावंडांचं एकमेकांशी वागणं अत्यंत आपुलकीचं आहे. ४७-४८ साली आमच्या खेडला बाबूरावांचं लग्न झालं. त्यानंतर काही वर्षांनी त्यांनी मनोहरपंतांकडील नोकरी सोडली व ते आपल्या स्वतंत्र व्यवसायाला लागले.

पुस्तकप्रकाशन, विक्री आणि जाहिरातवितरण या व्यवसायात बाबूरावांनी १९५४च्या सुमारास उडी ठोकली ती केवळ स्वतःच्या हिंमतीवर. स्वतःचा अनुभव आप्तस्वकीय, मित्रपरिवार यांच्या सदिच्छा हेच त्यांचं भांडवल होतं. बाबूरावांनी गेल्या १७-१८ वर्षांत पाहतापाहता आपला उत्तम जम बसवला. धंद्यात

बाबूरावांना शत्रू माहीत नव्हता. त्यांनी माया किती जमवली हे सांगता येणार नाही आणि ती फार असेल हे मुळीच संभवत नाही. प्रकार काहीसा उलटा असेल अशीच मला भीती वाटते. पण बाबूरावांनी या १७।१८ वर्षांच्या व्यवसायात कितीतरी माणसं जोडली. अनेकजण त्यांच्या उपयोगी पडले, अनेकांना पदरमोड करून ते उपयोगी पडले. एक अल्पशिक्षित, गरीब, काळासावळा, अनाकर्षक व्यक्तिमत्वाचा, दुर्बळ प्रकृतीचा माणूस स्वतःच्या मोठ्या कुटुंबात, धाकुटा असून मोठेपणाची धुरा आनंदाने मिरवत राहतो आणि ग्रंथव्यवहाराचा गुंतागुंतीचा व्यवहार सचोटीने करून, या क्षेत्रात शेवटी मित्रभावाचं उदंड भांडवल उभारतो हा खरोखरी मोठा पुरुषार्थ आहे.

ग्रंथप्रकाशनादी व्यवसाय बाबूराव इनामदार एकटे करीत होते. पण त्यांच्या संस्थेचं नाव होतं 'इनामदार बंधू प्रकाशन' बाबूरावांचे हे बंधुप्रेम आणि कौटुंबिक जबाबदारीची जाणीव खरोखरी दुर्मिळ आहे. त्यांचे सर्व बंधू कर्तेसवर्ते आहेत. बाबूरावांविषयी त्यांना विलक्षण प्रेमादर होता. घरी दारी सर्वत्र हे असेच प्रेमाचे, स्नेहाचे वातावरण बाबूरावांनी निर्माण केले होते आणि तेच त्यांच्या यशस्वी व्यवसायाचे गमक होते.

बाबूरावांचे शंभरावे प्रकाशन चालू वर्षअखेर केंव्हातरी निघणार होते. त्या संबंधात त्यांचेमाझे आजकाल बोलणे होई. या संकल्पित प्रकाशनप्रसंगी बाबूरावांचे आम्ही लेखकमित्र त्यांच्यासंबंधी हिरीरीने गौरवपर लिहिणार होतो. पण निष्ठुर काळाने बाबूरावांना अर्ध्या पानावरून उठवून नेले. परमेश्वरावरील विश्वास साफ उडून जावा अशी ही क्रूर घटना आहे. जरा कुठे आर्थिक स्थैर्य, प्रतिष्ठा येत होती, तर काळाने ही करणी केली. लेखक, प्रकाशक, विक्रेते, मुद्रक, संपादक इत्यादी बाबूरावांचे जे शेकडो मित्र आहेत त्यांना या घटनेमुळे अगदी मनापासून दुःख होत आहे.

माझी सहा पुस्तके बाबूरावांनी प्रकाशित केली. त्यांच्या आवृत्त्यावर आवृत्त्या काढल्या. त्यांच्या पुस्तकांमुळेच मी लेखक म्हणून ओळखला जाऊ लागलो. आमची मैत्री सैपाकघरापर्यंत अखंड अतूट होती एवढं सांगितलं, म्हणजे त्यांच्या अकाली निधनामुळे मला किती दुःख झाले असेल याची कल्पना येईल. बाबूरावांच्या जाण्याने निरपेक्ष माया करणारे एखादे थोरले भावंड जावे असे मला वाटते आहे. मंगळवारी, सुट्टीचे वारी, त्यांच्याकडे तास-अर्धातास गेल्याविना मला राहवत नसे. मी गेलो नाही तर त्यांना, त्यांच्या पत्नीला चुकल्याचुकल्यासारखे होई. आता मंगळवार आला, की मला बाबूरावांच्या घरचा रस्तादेखील टाळावा लागेल. पन्नाशी जवळ आलेल्या पुरुषाने इतकं भावनावश होऊ नये, पण या स्वार्थाच्या बाजारात फार थोडी माणसं अशी भेटतात, की ज्यांच्याशी विश्वासाने सुखदु:खं बोलून मन ताजंतवानं करावं. बाबूराव इनामदार हा इमानदार माणूस माझी वीस वर्षे अशी सोबत करीत होता.

□ □ □

शरद गोखले



# गीता गाती ज्ञानेश्वर

बाळबोध
वळणाची
चमत्कृतिप्रधान
कलाकृती

ललितकलादर्श आणि आनंद संगीत मंडळी यांच्या सहयोगातून ज्या पद्धतीची कलाकृती अपेक्षित आहे अगदी त्याच पद्धतीचे नाटक या मंडळींनी 'शबास बिरबल'च्या पाठीवर आणले आहे.

ज्ञानेश्वरांच्या चरित्राबाबत प्राथमिक पुस्तकांतून जशा प्रकारची माहिती, जशा शब्दांत असते त्याच पद्धतीची माहिती, ज्ञानेश्वर चरित्रातील निवडक टप्प्यांचा मागोवा घेत आणि त्याला स्वत:च्या कल्पनेची जोड देऊन नानासाहेब शिरगोपीकरांनी संवादबद्ध केली आहे. साधे-सोपे बाळबोधी वळणाचे संवाद, आनंद संगीत मंडळीच्या नावारूपाला साजेसे चमत्कार आणि प्रसाद सावकार व भालचंद्र पेंढारकर यांनी संभाळलेली संगिताची बाजू, या भांडवलावर हा ज्ञानेश्वर ठराविक अपेक्षित प्रेक्षकवर्गावर जरूर मोहिनी घालत आहे. कारण काहीही असले तरी पुण्या-मुंबईच्या नाट्यपरिसरामध्ये सध्या मंदीची लाट आहे. नामवंत लेखकाच्या व प्रथम श्रेणीचे कलावंत आणि दिग्दर्शक असलेल्या एका नाटकाचा प्लॅन केवळ दीडदोनशे रुपयांमध्ये गुंडाळावा लागला. या मंदीच्या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वरांची धंद्यातील वाटचाल कौतुकास्पद म्हणावी लागल. दहा प्रयोगांमध्ये साठ हजार रुपयांचा गोव्याचा दौरा

या नाटकाने नुकताच पूर्ण केला आहे. आता हा ज्ञानेश्वर इतका यशस्वी का व्हावा हे एक कोडेच आहे ?

ज्ञानेश्वर चरित्रातला जो भाग नानासाहेब सांगतात तो असा : श्रीक्षेत्र आळंदी येथे ज्ञानदेव, सोपान, निवृत्ती व मुक्ताबाई ही भावंडे रहात असतात. या भावंडांचा व्यासंग न उमजलेला विसोबा, त्यांना धर्मबाह्य ठेऊन त्यांचा छळवाद मांडतो. पैठणला धर्मपीठाची मान्यता मिळवण्यासाठी गेलेल्या या भावंडांचा पिच्छा तो सोडत नाही. अखेरीस ज्ञानदेव योग सामर्थ्याने आपली पाठ तापवून मुक्ताबाईची मांडे करून घालण्याची इच्छा पूर्ण करतात. त्यावेळी विसोबाचे डोळे उघडतात. ज्ञानेश्वरी लिहून आपल जीवितकार्य पूर्ण झाल्यावर ज्ञानदेव समाधिस्त होतात. संपूर्ण लेखन बाळबोध पद्धतीचे, कोठेही खोल जाण्याचा प्रयत्न नाही. जागा मिळाली की घाल गाणे, आणि संधी मिळाली की दाखव चमत्कार – अशी वाटचाल करत शिरगोपीकर नाटक शेवटपर्यंत नेऊन भिडवतात. लेखनाच्या दृष्टीने हिणकस असलेल्या नाटकाचा प्रयोग मात्र ही मंडळी व्यवस्थित करतात. पात्रांच्या अपेक्षित वयाचे कलावंत प्रयोगामध्ये नसले तरी प्रसाद सावकार (ज्ञानदेव) व रसना (मुक्ताबाई) हे दोन कलाकार चांगले वाटतात. तथापि प्रयोग रंगवण्याचा भार प्रामुख्याने पेलतात ते भालचंद्र पेंढारकर – 'जाऊ नका,– या गीताबरोबर प्रवेश करणारा त्यांचा वासुदेव' नाटक अखेरपर्यंत जिवंत ठेवण्याची कामगिरी चोख बजावतो. सुकुमार यांचा (विसोबा) अगदी परंपराबद्ध पठडीतला आहे. पंढरीनाथ बेर्डे (निवृत्ती) व बाळ पुजारे (सोपान) हे अन्य दोन कलाकार उल्लेखनीय वाटतात.

शिरगोपीकरांचे हुकमी चमत्कार ही धंद्याची मोठी जमेची बाजू. वासुदेवाची टोपी फिरणे, मोगरा फुलणे, रेड्याचे तोंडून वेद येणे, आदी सर्व योजलेल्या जागा त्यांनी हुकमीपणाने टिपल्या आहेत. पैठण धर्मपीठाकडून ज्ञानेश्वर व त्यांच्या अन्य भावंडांना न्याय नाकारला जाण्याचा भाग त्यांनी प्रयोगाची लज्जत वाढेल अशा पद्धतीने दाखवला आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधीमध्ये मुक्ताईचा हार ज्ञानेश्वरांच्या गळयात पडणे, समाधीचा परिसर क्षणात सुवर्णमय होणे, विठ्ठल-रखुमाईने समाधिस्त ज्ञानेश्वरांना आशीर्वाद देणे, हा सर्व अखेरचा भाग वातावरणनिर्मितीच्या दृष्टीने उत्कृष्ट आहे.

बाळबोध वळणाची, ही चमत्कृतिजन्य संगीतप्रधान कलाकृती धंद्याचे गणित मात्र बऱ्यापैकी जमवून जाईल असे लक्षण दिसले.

□ □ □

# संजोग

चमत्कारिक सुरस कथा

एक जमाना असा होता, की मद्रासी चित्रपट निर्मात्यांचे यश पाहून मुंबईमधील निर्माते चक्रावून गेले होते. भलं मोठं कुटुंब–कुटुंबावर येणारी संकटे, जोडीला शुभा खोटे, मेहमूदचा रिलीफ–असा हा भैय्या-भावीचा मामला प्रेक्षक मोठ्या चवीने पहायचे, अजूनही या पद्धतीचं एखादं चित्र जरूर चालतं. विलक्षण यशस्वी ठरलेल्या राज खोसला यांच्या दो रास्तेमध्ये तरी विशेष काय होतं ? जेमिनी चित्र या मद्रासच्या नामवंत संस्थेचा संजोग पहाताना मला या मद्रासी फॉर्म्युल्याची तीव्रतेने आठवण झाली. मिश्रणामध्ये थोडाफार बदल झाला असला, तरी पठडी सर्वसाधारणपणे तशीच आहे.

कलेक्टर कचेरीमध्ये आज मोठी गडबड उडालेली असते. कारण नवीन कलेक्टर आशाबाई आजपासून आपल्या जागेची सूत्रे घेणार असतात. स्वाभाविकच वातावरण उत्सुकतेने भरून गेलेले असते. कचेरीचे हेडक्लार्क मोहनबाबू आपल्या पत्नीच्या मागे लागून घाईगर्दीने कपडे करून कचेरीत येतात. नवीन बाई आल्याची वार्ता येते. कलेक्टरबाईंचा चिटणीस ओळख करून देण्यासाठी आशाबाईंना मोहनबाबूं-जवळ घेऊन येतो आणि दोघांनाही आश्चर्याचा धक्का बसतो. कारण कलेक्टर म्हणून समोर उभी असलेली आशा दुसरी तिसरी कोणी नसून मोहनबाबूंची एके-काळची प्रेयसी असते. प्रेमाचे रीतसर विवाहामध्येही रूपांतर झालेले असते. तथापि श्रीमंती–गरिबीमुळे येणाऱ्या अडचणी या जोडप्याची ताटातूट करतात आणि आता हे दोघे एकमेकांसमोर उभे असतात ते कलेक्टर व त्याच कचेरीतील हेडक्लार्क म्हणून. (आता हा प्रसंग तसा चमत्कारिक आहे. कृत्रिम आहे. परंतु अशा असंभाव्य घटना आणि त्यातून उभे रहाणारे नाट्य याची आपल्या प्रेक्षकांना चटकच लागली

आहे. त्यामुळेच अरबी कथेत शोभणाऱ्या असल्या चमत्कारिक सुरस घटनांवरील चित्रपट चवीने पाहिले जातात.)

कलेक्टर आशाबाई आणि हेडक्लार्क मोहनबाबू विवाहित पति-पत्नी म्हणून अशा विचित्र परिस्थितीत गाठ पडल्यावर कथेचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध सांधून प्रेक्षकांसमोर ठेवणे फारसे अवघड नाही. या प्रकरणातही आशा–मोहनचे प्रेम-प्रकरण, विवाह, ताटातूट, मोहनच्या घरवाल्यांकडून आशा मरण पावल्याची मोहनची समजूत करून दिली जाणे, आय. ए. एस. होऊन कलेक्टर होण्याची स्वप्ने पहाणाऱ्या मोहनला दाखवून पसंत केलेल्या मुलीशी लग्न करून कारकुनी करत संसार करण्याची वेळ येणे, हा सर्व भाग फ्लॅश बॅकने सांधून घेतला आहे. पति-पत्नींचे कलेक्टर व हेडक्लार्क हे नाते निर्माण झाल्यावर काही नाटकी प्रसंग निर्माण करून प्रेक्षकांची बहुत करमणूक करण्यात आली आहे. आता एक मोहन आणि आशा व सिमा, या दोन स्त्रिया अशी परिस्थिती कशी चालणार? तेव्हा हिंदी चित्रपटामध्ये परंपरेने चालत आलेल्या कड्याच्या टोकावर सीमा जीव द्यायला जाते. तिचा पाठलाग करत आशाही अचूक तिथेच पोचते. सुरुंगाचा स्फोट होतो. आशा मरते, परंतु अपघातात आंधळी झालेल्या सीमाला आपले डोळे देते. डोळ्याला रुमाल लावत महिला प्रेक्षक बाहेर पडतात.

चित्रपटाचे दिग्दर्शन वासन यांच्यानंतर जेमिनीची सूत्रे घेतलेल्या एस्. एस्. बालन यांनी केले आहे. बेतलेल्या कथेवर त्यांनी तांत्रिक सफाईचा हात फिरवला आहे. चित्रपट निर्मिती हा व्यवसाय आहे. हे पक्के डोक्यात बसलेल्या मंडळींमध्ये वासन आघाडीवर होते. बालनही तीच कल्पना उरी बाळगून असल्याचा प्रत्यय संजोग देतो. सर्वसाधारण हिंदी चित्रपटामध्ये हल्ली जो वाह्यातपणा आला आहे त्याला फाटा देऊन प्रेक्षकांना रुचेल अशी कथा चित्रित करण्याचे श्रेय त्यांना जरूर द्यावे लागेल. सांगोपांगी अफवा कशा पसरतात, त्याचे त्यांनी केलेले चित्रण चोरलेले असले, तरी छान जमले आहे. कलेक्टर कचेरीतील कारकुनाने कलेक्टर झाल्याचे स्वप्न बघण्याचा भाग अतिरंजित असला तरी पिटातल्या प्रेक्षकांचे दृष्टीने योजला असल्याने क्षम्य आहे. विदूर कारकुनाने स्वतःच्या मुलाला टोकरीत घालून कचेरीत आणण्याची कल्पना मूर्खपणाची आहे. तसेच नवीन कलेक्टरच्या स्वागत प्रसंगी योजलेला करमणुकीचा कार्यक्रम म्हणजे शुद्ध चक्रमपणा आहे.

आशाची प्रमुख भूमिका मालासिन्हाने मोठी झकास केली आहे. फार दिवसांनी घडणारे तिचे रुपेरी पडद्यावरील दर्शन तिच्या चाहत्यांना खूष करील. आनंदमध्ये विलक्षण प्रभावी ठरलेला अभिताभ बच्चन, इथे मोहनच्या भूमिकेमध्ये निरर्थक ठरला आहे अरुणा इराणीनं साधी भोळी सीमा छान रंगवून आपण हरहुन्नरी कलाकार असल्याचे सिद्ध केले आहे. छोट्या भूमिकेत नझीर हुसेन, (सीमाचे पिताजी) व मदन मोहन (आशाचे पिताजी) ठीक वाटतात. जॉनीवॉकर संपल्याचे

प्रकर्षाने जाणवते. राहुलदेव बर्मन यांचे संगीत सध्याच्या हिंदी चित्रपटांना मानवेल असे आहे. ◻

# बॉम्बे टू गोवा

## एक रंजक प्रवास

निखळ विनोदी हिन्दी चित्रपट ही एक दुर्मिळ बाब आहे. आपला विनोदी चित्रपट हा केविलवाणा असतो. आणि आपल्या विनोदी चित्रपटाला रहस्याची वा थ्रिलची जोड हमखास दिली जाते. महमूदमियांचे 'बॉम्बे टू गोवा' हे ताजे चित्र मात्र अतिरंजिततेचा भाग सोडला तर पुष्कळंच रंजक वाटते. कथा तशी योगायोगांवार आधारलेली आहे. चित्रपटाला कथा असली, तरी कथेला फारसे प्राधान्य नाही. चित्रपट रंगवला आहे तो लहानमोठ्या प्रसंगातून.

धनाढ्य बापाची एकुलती एक सुंदर कन्या, हिन्दी चित्रपटामध्ये नसली तर चुकल्यासारखं वाटते. प्रेक्षकांच्या सुदैवाने महमूदमियांच्या या चित्रपटामध्ये माला नावाची अशी एक धनाढ्य बापाची एकुलती एक सुंदर कन्या आहे. आई-वडलांच्या 'लाडप्यार'मध्ये वाढलेली ही माला चित्रपट तारका होण्याची स्वप्ने पहात आहे. अशा पोरींच्या शोधामध्ये हिंडणारी शर्मा-वर्मांची जोडी मालाला अचूक जाळ्यात अडकवते. फिल्मी साप्ताहिकात फोटो छापून आल्यावर घरच्या मंडळींना मालाचे हे वेड कळते. मग 'खानदानकी इज्जत' वगैरे नेहमीचा प्रकार आणि शर्मा-वर्मांच्या सल्ल्याने मालाचे घरातून पलायन.

घरातील संपत्तीवर डल्ला मारून माला या जोडीकडे येतें. पैशाच्या लोभाने या मंडळींत झालेली हमरातुमरी ती अचूक पहाते. आणि पलायन करते. तिचा पाठलाग करणाऱ्या शर्मा-वर्माला गुंगारा देऊन माला गोव्याकडे जाणारी एक धावती बस पकडते. मालासाठी वेडावलेला एक तरुण याच गाडीत येतो. या प्रवासी गाडीमध्ये अनेक प्रकारचे उतारू असल्याने छोटेमोठे अनेक प्रसंग लेखकाने निर्माण करून हा प्रवास रंजक करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात बस कंडक्टरने मुर्गीऐवजी साप पकडून आणण्यासारखा आचरटपणाही यात आहे. तथापि सर्वसाधारणपणे हा प्रवास खूपच रंजक झाला आहे. आगावूपणाचा काही भाग सोडला तर बस-कंडक्टरच्या भूमिकेत वावरणारा महमूद खूपच धमाल करतो. सिनेमावेड्या मालाची भूमिका अरुणा इराणी एकदम झकास करून जाते. मालाच्या प्रियकरांच्या भूमिकेमध्ये अभिताभ बच्चन एक वेगळाच रंग भरून जातात. सर्वच कलावंतांना चित्रपटाचा मूड अचूक समजल्याने चित्रपटाची लज्जत वाढली आहे. शत्रुघ्न सिन्हा सराईत कलाकारांच्या कौशल्याने शर्माजी रंगवून जातात. स्टाइल्ड असला तरी एक चांगला खलनायक म्हणून शत्रुघ्न हे नाव पुढील दहा वर्षे तरी सातत्याने

नोंदवले जाणार आहे.

बॉबे-गोवा, हे दिग्दर्शकाच्या दृष्टीने काहीसे अवघड चित्र. तथापि पहिले चित्र असूनही रामनाथन् यांनी ही जबाबदारी चांगली पेलली आहे. जाल मिस्त्रीचे छायाचित्रण आणि राहुलदेव बर्मन यांचे संगीत ही चित्रपटाची आणखी दोन आकर्षणे आहेत.

रूळल्या वाटेने जाणारा संजोग आणि भडक व अतिरंजित असली तरी वेगळी करमणूक देणारा बॉम्बे-गोवा हे दोन्ही चित्रपट यशस्वी तामीळ चित्रपटावरून तयार केले आहेत, हे एक नोंदण्यासारखे वैशिष्ठ्य आहे. □ □ □

## महाराष्ट्र तरुण शांतिसेनेची ग्रीष्मकालीन शिबिरे

अखिल भारतीय तरुण शांति सेनेनेर्फे दर वर्षी उन्हाळ्यात राष्ट्रीय व प्रांतिक ग्रीष्मकालीन शिबिरांचे आयोजन होत असते. यंदा महाराष्ट्रात तीन आंतर प्रदेशीय शिबिरांची एक मालिका घेतली जाणार आहे. समाज परिवर्तनाची तीव्र आकांक्षा ज्यांच्या हृदयात धगधगते आहे अशा महाविद्यालयीन स्तरावरील तरुण-तरुणींनी एकत्र येऊन विचार मंथन करावे अशी या शिबिरांच्या आयोजनामागील दृष्टी आहे. पैकी प्रथम शिबिर नागपूरला ४ ते १२ मे, दुसरे धुळे जिल्ह्यातील शहादे येथे ४ ते १३ जून व अंतिम कोल्हापूरला १६ ते २२ जून या अवधीत घेतले जाईल.

वरीलपैकी नागपूर व कोल्हापूर येथील शिबिरे मुख्यतः अध्ययनप्रधान, तर शहादे समस्याप्रधान शिबिर राहील. "१९७२, स्वराज्याचा रौप्य-महोत्सव" या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित असे अनेक विषय चर्चेसाठी घेण्यात येऊन त्यावर अधिकारी व्यक्तींची बौद्धिकेही होतील. आचार्य दादा धर्माधिकारी, अच्युतराव पटवर्धन, बाबासाहेब आमटे, प्रा. नरहर कुरुंदकर, हमीद दलवाई, अण्णासाहेब सहस्रबुद्धे इ. विचारवंतांना निमंत्रणे गेली आहेत.

धुळे जिल्ह्यातील आदिवासी समस्येशी जो परिचित नाही, असा जागृत युवक महाराष्ट्रात नसावा. शहाद्यातील शोषित आदिवासींच्या परिस्थितीची ओळख करून अन्यायाशी दोन हात करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींना तिथे निमंत्रण आहे. प्रत्येक शिबिरात केवळ १०० युवकयुवतींनाच प्रवेश दिला जाईल. आवेदन पत्रांसाठी खालील पत्त्यावर संपर्क करा. आवेदन पत्र स्वीकारण्याची अंतिम तारीख २० एप्रिल, १९७२ आहे.

संयोजक, अ. भा. तरुण शांतिसेना, महाराष्ट्र विभाग, गोपुरी—वर्धा

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649




" हुश्श्य ऽऽ ! संपले एकदाचे ते दौरे, त्या प्रचारसभा, ती आश्वासनं गरिबी हटाव, समाजवादी रचना, ती कमाल जमीन धारणा...."